

गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com



* वर्ष ६५ वे * अंक ३०३ * नांदेड * रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

ना सत्तेत जाणार, ना विलिनीकरण होणार

दादा होता तोपर्यंतच चर्चा, आता फुल्ल स्टॉप -खा. सुप्रिया सुळे

मुंबई (प्रतिनिधी)- यावेळी सुळे म्हणाल्या, एनडीए सोबत जाण्याची चर्चा नाही. जिथे चर्चा नाही तिथ कॉमा, फुलस्टॉप विषय येत नाही. एसए लिहिला नाही तर त्याबाबत का बोलायचं? अशा शब्दात विलीनीकरणाच्या चर्चांना खासदार सुप्रिया सुळे यांनी फुलस्टॉप लावला आहे.



राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाची चर्चा सुरू आहे. गाठीभेटी, चर्चा, बैठका या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवरती विलिनीकरणासंदर्भात वेगवेगळे दावे करण्यात येत होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे, वक्तव्ये करण्यात येत होती. अशातच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबत आणि एनडीएसोबत सत्तेत जाण्याच्या चर्चांवरती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी शनिवारी पत्रकार परिषद घेऊन सविस्तरपणे भाष्य केलं आहे.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, विलीनीकरणाच्या चर्चांचा मला आता कंटाळा आला आहे. माझा भाऊ (अजित पवार) होता तोपर्यंत विलिनकरणाची चर्चा होती, तारीखही ठरली होती. ज्या दिवशी माझा भाऊ गेला, त्या दिवशी विलीनीकरणाबाबत माझ्या मनात, माझ्या पक्षात फुल स्टॉप झाला, ज्या दिवशी संघटनेतील पदाधिकारी आणि माझा अजितदादा यांच्याशी चर्चा झाली होती. त्याचे व्हिडीओ पण तुम्ही दाखवले. माझा भाऊ होता तोपर्यंत विलीनीकरणाची चर्चा होती. ज्या दिवशी भाऊ गेला त्या दिवशी विलीनीकरणाला फुल स्टॉप झाला. आमच्याकडून एकही स्टेटमेंटनंतर केलेलं नाही. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून जे स्टेटमेंट आली त्याला आम्ही काऊंटर केलेलं नाही. जे आमचं पुढे जायचं ठरलं होतं, ते अजितदादांसोबत ठरलं होतं. काही गोष्टी हृदयातूनही होतात, विलीनीकरणाच्या चर्चांवर आज जे काही आहे ते प्रश्न विचारुन टाका, आज काय ते होऊन जाऊ द्या. यापुढे मी विलिनिकरणावर बोलणार नाही. या चर्चांवरुन मला कंटाळा आला आहे, असंही सुप्रिया सुळेंनी स्पष्ट केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सत्तेत होण्याचा विषयचं येत नाही, असंही सुप्रिया सुळेंनी स्पष्ट केलं आहे. अजित पवार गटातून कुणाचाही प्रस्ताव आलेला नाही, फोन, मेसेज काहीही आलेलं नाही. माझा भाऊ गेला त्यावेळी सगळा विषय संपला आहे, असं सुप्रिया सुळेंनी सांगितलं आहे.

मतदारसंघ फेररचना विधेयकाबाबत समर्थनाचे संकेत

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी १४ नोव्हेंबर २०२६ रोजी मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर सकारात्मक आणि सशर्त पाठिंब्याचे संकेत दिले आहेत. लोकसंख्येच्या आधारावर बदल न करता देशातील सर्व राज्यांच्या लोकसभा जागांमध्ये सरसकट ५० टक्के वाढ होणार असेल आणि सर्व मित्रपक्षांची याला संमती असेल, तर या प्रस्तावावर गांभीर्याने विचार केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

भाजप खासदार कंगना रणौत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नवी दिल्ली (प्रतिनिधी)- सोशल मीडियावरील एका पोस्टद्वारे गांधी कुटुंबावर आक्षेपार्ह टिप्पणी केल्याच्या आरोपाखाली हिमाचल प्रदेश पोलिसांनी भाजपाच्या मंडी येथील खासदार कंगना रणौत यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शिमल्यातील बालुगंज पोलीस ठाण्यात हा गुन्हा नोंदवण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे.



शिमला पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० नोव्हेंबर रोजी कंगना रणौत यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर काही पोस्ट केल्या होत्या. या पोस्टमध्ये माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, राजीव गांधी, दिवंगत नेते संजय गांधी आणि काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्याबद्दल आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणारी विधाने केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या संदर्भात शिमल्यातील अतुल शर्मा यांनी राज्याचे पोलीस महासंचालक अशोक तिवारी यांच्याकडे ईमेलद्वारे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी रणौत यांच्याविरोधात कारवाई केली आहे.

तक्रारदार अतुल शर्मा यांनी बालुगंज पोलीस ठाण्यात जाऊन आपला लेखी जबाब नोंदवला आहे. याबाबत बोलताना शर्मा म्हणाले की, मी पोलीस महासंचालकांना ईमेलद्वारे तक्रार पाठवून गुन्हा दाखल करण्याची आणि या प्रकरणाचा विहित मुदतीत सायबर फॉरेन्सिक तपास करण्याची मागणी केली होती.

राज्यात हुडहुडी वाढली!

मुंबई (प्रतिनिधी)- नोव्हेंबरमध्ये राज्यात हुडहुडी वाढत असल्याचे दिसून येत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये थंडीची चाहूल लागली आहे. त्यामुळे सकाळी गारठा आणि दुपारी उन्हाचा कडाका, असे दुहेरी हवामान अनुभवायला मिळत आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागांत किमान तापमान १५ अंशांच्या खाली घसरल्याने थंडीचा प्रभाव वाढू लागला आहे. निफाडमध्ये राज्यातील नीचांकी ११.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे.

निफाड येथील गहू संशोधन केंद्रात ११.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. धुळे येथील कृषी महाविद्यालयात १२ अंश, परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठात १२.३ अंश, तर गोंदिया येथे १२.८ अंश तापमानाची नोंद झाली. जळगाव, जेऊर आणि नाशिक येथे किमान तापमान १४ अंशांच्या खाली घसरले. पुणे, सातारा, नागपूर आणि यवतमाळ येथेही पारा १५ अंशांच्या खाली राहिला.

उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, निफाड, धुळे आणि जळगाव परिसरात पहाटेच्या तापमानात घट झाल्याने थंडी अधिक जाणवू लागली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे आणि सातारा जिल्ह्यांतही किमान तापमान १५ अंशांच्या खाली असल्याने सकाळी गारठा जाणवत आहे. विदर्भातील नागपूर, गोंदिया आणि यवतमाळ येथेही थंडीची चाहूल लागली आहे. परभणीसह मराठवाड्यातील काही भागांतही किमान तापमानात घट झाली आहे.

एकीकडे पहाटे थंडी वाढत असताना दुसरीकडे दुपारचे तापमान मात्र चाळिशीच्या जवळ पोहोचण्याच्या दिशेने आहे. सकाळपर्यंतच्या २४ तासांत मुंबईतील सांताक्रुझ येथे राज्यातील उच्चांकी ३६.१ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले. रत्नागिरी येथे ३६ अंश, तर अकोला, अमरावती, सोलापूर, जळगाव, डहाणू आणि यवतमाळ येथे ३४ अंशांपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली.

राज्यातील कमाल आणि किमान तापमानातील तफावत १४ ते २१ अंशांपर्यंत पोहोचली आहे. धुळे, जळगाव आणि निफाड येथे ही तफावत तब्बल २१ अंश आहे. त्यामुळे सकाळी थंडी, तर दुपारी उन्हाचा चटका जाणवत आहे. राज्यातील कमाल आणि किमान तापमानातील चढ-उतार कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.

आशिया कपच्या अंतिम सामन्यात भारताचा पाकिस्तानवर विजय



मुंबई (प्रतिनिधी)- अंडर १९ आशिया कप २०२६ च्या अंतिम सामन्यात भारताने शेवटच्या चेंडूवर पाकिस्तानवर विजय मिळविला आहे.

एसीसी आशिया कप २०२६ स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारत आणि पाकिस्तान हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात नाणेफेकीचा कौल हा पाकिस्तानच्या बाजूने लागला आणि त्यांनी प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानने ५० षटकात ९ गडी गमवून ३३७ धावा केल्या आणि विजयासाठी ३३८ धावांचं आव्हान दिलं. हे आव्हान भारतीय संघासाठी कठीण होतं. भारताने या धावांचा पाठलाग करताना आश्वासक सुरूवात केली होती. मात्र त्यानंतर डाव गडगडला. त्यामुळे हा सामना हातून गेला असंच प्रत्येकाला वाटलं. पण नवव्या विकेटसाठी मनल चौहान आणि मोहित उलवा यांनी ५७ धावांची भागीदारी केली आणि भारताचा विजयाच्या आशा पल्लवित झाल्या आणि झालंही तसंच... भारताला शेवटच्या चेंडूवर ३ धावांची गरज होती आणि एक विकेट हातात होती. मोहित उलवाने चौकार मारला आणि भारताला विजय मिळवून दिला. भारताने अंडर १९ आशिया कप स्पर्धेत नवव्यांदा जेतेपद पटकावलं आहे. तसेच पाकिस्तानचा मागच्या स्पर्धेतील आणि साखळी फेरीतील पराभवाचा वचपाही काढला.

कार्तिकी वारीनिमित्त २४ तास मिळणार विठुरायाचे दर्शन

पंढरपूर (प्रतिनिधी)- सावळ्या विठुराया कार्तिकी यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी विठुरायाचे २४ तास दर्शन मिळणार आहे.

दि. १४ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर या कालावधीत देवाचे दर्शन २४ तास राहणार आहे. देवाचा विश्रांतीचा चांदीचा पलंग विधिवत पूजा करून काढण्यात आला. त्यानंतर विठ्ठलाच्या मागे आणि रुक्मिणी मातेच्या पाठीला मऊ कापसाचा लोड लावण्यात आला असल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे.

वारकरी संप्रदायाला शेकडो वर्षांची परंपरा आहे. या परंपरेनुसार आषाढी आणि कार्तिकी वारीच्या दरम्यान भाविकांना दर्शन सुलभ व्हावे म्हणून देव २४ तास उभा असतो. या कालवधीत देवाच्या शेजघरातील विश्रांतीचा पलंग काढला जातो. हा पलंग काढण्या आधी विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर देवाच्या शेजघरातील पलंग बाहेर काढण्यात आला. यावेळी या चांदीच्या पलंगावरील देवाच्या गाद्या, गिरद्या देखील बाहेर काढून ठेवण्यात आल्या. देवाचे शेजघर मोकळे करून ठेवण्यात आले आहे.

कापूस- मिरचीच्या आड गांजाची शेती! किनवटमध्ये एलसीबीचा छापा

१८ किलो ४८० ग्रॅम गांजासह ९.२४ लाखांचा मुद्देमाल जप्त, शेतकरी ताब्यात



किनवट (प्रतिनिधी)- किनवट तालुक्यातील सिंगारवाडी शिवारातील एका शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड केल्याचा प्रकार स्थानिक गुन्हे शाखा, नांदेडच्या पथकाने उघडकीस आणला. दि.१३ नोव्हेंबर रोजी केलेल्या या कारवाईत पोलिसांनी १८ किलो ४८० ग्रॅम गांजा जप्त केला असून, त्याची किंमत ९ लाख २४ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक किनवट व माहूर उपविभागात अवैध धंद्यांची माहिती घेत असताना सिंगारवाडी शिवारात गांजाची लागवड केल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित शेतात छापा टाकला. या कारवाईत सिंगारवाडी येथील गट क्रमांक ४२ मधील शेतात गांजाची लागवड केल्याचे आढळून आले. पोलिसांनी गांजाची झाडे जप्त केली.

जप्त केलेल्या गांजाचे एकूण वजन १८ किलो ४८० ग्रॅम असून, त्याची किंमत ९ लाख २४ हजार रुपये आहे. याप्रकरणी दत्ता खंडू जाधव (रा. सिंगारवाडी, ता. किनवट) याला ताब्यात घेण्यात आले आहे.याप्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याच्या कलम ८ (ब), २०(अ) (II) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व किनवट पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. अवैध अमली पदार्थांची लागवड, विक्री व वाहतरणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

वजिराबाद ते कलामंदिर रस्त्यावरील अतिक्रमण हटविले

फळविक्रेत्यांचा विरोध, काही ठिकाणी पथकासोबत वाद

नांदेड (प्रतिनिधी)- शहरातील प्रमुख रस्ते आणि वर्दळीच्या चौकांमध्ये वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीची कोंडी आणि नागरिकांची गैरसोय होत असताना महापालिकेने पुन्हा अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे. शनिवारी सकाळी महापालिकेच्या अतिक्रमण हटाव पथकाने शहर वाहतूक शाखेच्या सहकार्यानेच वजिराबाद ते कलामंदिर या मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची कारवाई केली.



या कारवाईदरम्यान काही फळविक्रेत्यांनी विरोध करत पथकासोबत वाद घालण्याचा प्रयत्न केला.

शहरातील प्रमुख रस्ते, वाजारपेठा आणि वर्दळीच्या चौकांमध्ये हातगाडे, फळव्तिोरे, पावभाजी विक्रेते तसेच इतर व्यावसायिकांनी रस्त्याच्या कडेला आणि फुटपाथवर आपले व्यवसाय थाटले आहेत. दरम्यान, वाहतुकीची वाढती कोंडी आणि नागरिकांच्या तक्रारी लक्षात घेऊन शनिवारी महापालिकेच्या अतिक्रमण हटाव विभागाने शहर वाहतूक शाखेच्या संयुक्त विद्यमाने वजीरावाद ते कलामंदिर परिसरात मोहीम राबविली. रस्त्याच्या कडेला तसेच फुटपाथवर करण्यात आलेले अतिक्रमण हटविण्यात आले. कारवाई सुरू असताना काही फळविक्रेत्यांनी विरोध दर्शवत पथकासोवत वाद घालण्याचा प्रयत्न केला. काही व्यापाऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर पथक पुढील भागाकडे रवाना झाल्याचीही चर्चा आहे.

अजितदादांच्या अपघातामागील लोकांना वाचवणारा मफलरवाला नेता कोण?

आ. रोहित पवार सोमवारी घेणार पत्रकार परिषद

पुणे (प्रतिनिधी)- अजित पवार यांच्या अपघातामागे घातपात असल्याचा संशय आणि या प्रकरणातील काहींना वाचवलं जात असल्याचा दावा गेल्या काही महिन्यांमध्ये सातत्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते आणि आमदार रोहित पवार करत आहेत. अशातच त्यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एक पोस्टर शेअर केले असून याची सध्या राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. अजितदादांच्या अपघात/घातपातामागे असलेल्यांना वाचवणारा नेता कोण? असा थेट प्रश्न या पोस्टरमधून विचारण्यात आला आहे.

विशेष म्हणजे या पोस्टरवर कुणाच्याही नावाचा उल्लेख करण्यात आलेला नाही, मात्र त्यावर एका मफलरची प्रतिकृती छापण्यात आली आहे. या पोस्टरच्या माध्यमातून १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर येथे नेमकं काय घडणार आणि कोणता राजकीय बॉम्ब फुटणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

यापूर्वी देखील रोहित पवार यांनी अजित पवारांच्या अपघात प्रकरणी 'व्हीएसआर' कंपनीला वाचवणारा 'मफलरवाला नेता' कोण, असा सवाल उपस्थित केला होता. त्यावेळी हा नेता अरविंद केजरीवाल किंवा छगन भुजबळ नसून दुसराच कोणीतरी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. तसेच, १० ऑक्टोबर रोजी या नेत्याचे नाव जाहीर करून पर्दाफाश करणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

रोहित पवार यांच्या याच जुन्या वक्तव्याचा संदर्भ घेत आता १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पत्रकार परिषद घेत कोण नवीन गौप्यस्फोट करणार, हे पाहणंही महत्त्वाचं राहणार आहे. या अपघातामागील सूत्रधारांना पाठीशी घालणारा नेता नेमका कोण, अशी विचारणा करण्यात आली आहे.





वऱ्हाडी विनोदी कथा

अयदीशेंबेल मानूस

आटपाट नगर होतं. हिरवाईच्या दाट सावलीत वसलेलं गाव त्याच नावं सयदापूर. जस गावाचं नावं तसेच तथुल्ले लोकं. शे सव्वाशे घराचं गाव लयचं साजरं. मोठमोठाले मावदाचे, पांढऱ्या मातीचे घरं. ऐसपैस आंगनं. आंगनात रंगारंगायची फुलायचे, फयायचे झाळ . खोलं पांदनीतूनं गावात जानारा रस्ता. रसत्याच्या कळेले बोरी, बाभूयी, सुईबाभूयीचं, कोरांट्याचे झाळं. गावाच्या मध्यभागी पटांगनं. पटांगनाच्या एकांग भल्लमोट्ठ वळाचं झाळं. शंभरक सालाचं झाळ असनं त्याच्या पारंब्यां खाली लोयलेल्या. दिवसभर गाव सामसूम पन् जसा सूर्य मावळतीले निंघे तशी गावात दिवाई सारखी धामधुम वाटे. वावरातूनं थकूनभागूनं येनारे गावकरी , शेतकरी, शेतमजूर, शाळेतूनं येनारे पोट्टे, , धुळळा ऊळवत येणारे जित्राब . अवघ्या गावात कलकलाट चाले जसा थ्या वळाच्या झाळावर पाखरायचा. घराघरातूनं धुरांड्यातूनं, कवलातूनं, तये गेलेल्या भिताळातूनं, दरोज्यातूनं, बेपटीबेपटीतूनं धुपटाचे लोंढेच्या लोंढे दिसतानी दिसे. चुलीवर बकरी-मेंढीच्या दुदाचा गुय टाकलेला चा गदगदे. वास अवघ्या गावभर पसरे. ज्याच्या घरचा गूय, पत्ती सरली थे न लाजता एकम कायले ऊसनवारी मांगत. एकमेकायले चा प्याची जबरदस्ती करत. मानसं पारावर बसूनं दिवसभराच्या गप्पागोष्टी हानतं त बाया चा पिवूनं लागलीच भाकरी तुकळ्यासाठी चुलीत घुसतं. दिवसभर अफु हगूंन झोपलेले लायने पायन्यातले लेकरं टोंगयावर ईकळे तिकळे फिरत त गोरेगोमटे पोट्टे कोनाच्या कळीवर जावूनं बसत. गुरढोरं दाव्यात माना टाकूनं खुट्याशेजी बसूनं राह्यत. बक-या बागूलं करत दामोट्याची रास पाळतं. घराघरातूनं भाकरीचा कस्तुरीमय घमघमाट सुटे त कोनाच्या घरी लंब बेसनं, आखूळ चूनं, घातीच्या भाज्या गदगदत. गावात ना वान्याचं दुकानं ना लयनं, ना चक्की...अंधारात गुळूप झालेलं हे सयदापूर गांव.

ह्या गावात अजाबराव नावाचा एक मानूस राह्ये. गावाच्या एकदम ढांगाले याचं घरं. मायबाप खंगलेले. अजाब चाळीसक वर्षाचा अजूनं त्याचं लगनं झाल न्हवत. इतका अयदी की त्याले कोनं म्हतलं की वावरात चलत काय बे त थो म्हने ना ...त्याले बोलनं ही जीवावरं ये इतला थो अयदी. त्याची झोप इस घंट्यायची ऊरलेल्या चार घंट्यात थो वसरीत पाय पसरूनचं गाव पाह्ये . त्याले जेवाचा तसा हागाचा ही कटाया. दोन दिवसातूनं एक डावचं थो जेवे. जेवनं कमी असल्यानं तीन दिवसानं त्याले हागू ये. बरं गोदरीतही ना जाये. घराच्या मांगं त्यांन एक गड्डा केला होता. त्यानं कायचा घुसीनचं केला होता. थ्यानं फकस्त ऊकरवाकर केलं होतं. थ्या गड्यातच थो हागनं मुतनं अटपूनं घे. थ्याले भाकरं चावनं ही जिवावर ये म्हनूनसन्या थो मायले भातच टाकाले लाव्ये. अन् भाताची चिकट गोये न चावताच गीये. ऊन्हाया लागला होता. अजाबच्या बुड्यानं वावरातल्या आंब्याचे पिकेलं आंबे आनले. बुडीनं साजरा घट्ट रस केला. आंघोनीनं मांडे केले. अजाबरावले ऊठवे पन् थो काह्ही केल्या ऊठेना. आंगावर घळ्ळीभर पानी वतलं फकस्त पापन्या ऊलिश्या वदर करूनं पाह्ये अन् तरी थो ऊठेना. बुड्याचं डोक्स भनकलं हातात चुलीतली जयती झिलपी हानली ना अजाबच्या कंबळक्यात तसा अजाब खाळकन् जागी झाला. आन् बुड्याचं तोंड चालू झालं.

ऊठत काय नाह्ही बांडबुहा-या अयदी चोद्याच्या. जवा पाव्ह तवा पसरनं पसरनं पसरनं...अं ऽऽ काय लावलं बे. चाळीस सालचा झाला ना तरी काह्ही काम नाह्ही ना धंदा करत. कितीक पोसावं तुले आम्ही बुडाबुडीनं. जयक लाकूळं चांगलचं फेंडीवर लागल्यानं अजाबले कवा नाह्ही थे अज तोंड फुटलं...मी झोपतो त तुम्हाले काय तरास हायं सांगा बरं...ना कपळ्यालत्याचा ना खा प्याचा तरी मले सदानकदा मारत राह्यता.अबे तोंड पाह्यना आयन्यात कस मुंगसावानी दिसते. तुह्या यवळ्या लेकरायचे लगनं होवूनं तीनं तीनं चार चार लेकरं ही झाले अन् तू काहाळत राह्यं झोपा. आम्हाले जीतेपनी तरी नातवाचं तोंड दाखोशीनं काय नाह्ही तू.

मले नाह्ही कराचं हो लगनं फगनं...तुम्हाले कराचं असनं त तुम्हीचं करा दुसरं. पाह्यं कय ऊपट बोलते हे. मुस्काट फोळीनं बाबू उलटसुलट बोलशीनं त. चल ऊठ लवकर अन् जेवूनं घे. थांब आता तुव्हे एखांद्या भोकन्या-लंगळ्या पोरीसंग लगनचं लावूनं टाकतो. अजाबचा बाप तळतळाट करत पाय आपटत घरातूनं चाल्ला गेला. जसा बाप बाहेरी गेला तश्या अजाबच्या पापन्या खालच्या पापनीवर चक्कनं आपटल्या अन् थो घोराले लागला. अजाबची मायं बळबळ करत भांडे राखोळीनं जोरं लावत घासत होती. तीले अजाबचा लयच राग येत होता. तीनं डबलूनं घागरभर अजाबच्या तोंडावर पानी वतलं मांगल्या जेवाले दोनं दिवसं झाले होते. थो ऊठला मायनं तगादा लावूनं वाकयीतचं अजाबले रस, पोई, सरगुंडे, चिचोनी, कुरळ्या, पापळ, अन् भेदराची भाजी तासकित वाहाळूनं देह्ली. थो जीवावर आनूनं जेवत होता.

मा भात नाह्ही केला काय व ...भात नाह्ही ऊगमुय्यानं पोटभर रसपोई खायं. नाह्हीत तुह्या बापाले सांगनं. बुडीले दुरूनचं रसात पळलेली माशी दिसली. अरे बाबू तुह्या रसात पळळी काहाळ लवकर नाह्हीत वकशीनं भळभळ... काय करते व थे थेंम्बभर रस पेते पीवू दे तिले. असं म्हनून त्यानं थे माशी काह्ही काहाळली नाही तीले पिलेटीच्या एका कोप-यात सरकावली.

बापा बापा किती हटकोरं अन् अयदी भोकाचं पोट्ट हाय काजूनं. माशी काहाळाले ही याचा जीव जाते. बुडी दे-हायाकळे पाह्यत अन् देवाकळे हात करत म्हनते कशी... काय रे बापा कसा कपूत कुशीत देल्ला रे देवा. याचं काय होईनं आता तुच जाणो रे बाप्पा...बुडीचं तळकनं ऊठली अन् तीनचं माशी चिमटीत धरूनं ताटाबाहेरं फेकली. पोराच्या ह्या अयदी पनाले बुडाबुडी दोघही पारं हन्यासले होते. पोराचं कस् होईनं या कायजीत थे सदाई राह्यतं. अजाबच्या मायनं शंकुतलानं पोराच्या अयदीपना ईषयीची गोठ भावाच्या कानावर घातली होती. आठक दिवसानं अजाबचा म मामा बि-हाड घेवूनं सयदापूरात रसाले आला. सोबत बायको अन् पोरगी ही घेवूनं आला. भाच्याचं अयदीपनाचं नाटक पाहूनं थ्याले बयनीची किव येत होती. एकूलतंएक पोरगं अन् लयचं सोंग करूनं राह्यलं म्हनून थ्यानं बयनीजौळ अन् जवायाजौळ आतोघरी भाशी द्याचं ठरलं. अजाबचं लगनही झपीच्या गुंगीतचं झालं. लगनाले चार दिवस झाले आठ दिवस झाले मयना ऊलटला पन् अजाबचा अयदीपना काह्ही केल्या जायेना. थो बायकोले पाह्येहीना. बुडाबुडी कायजीनं ईरत चाल्ले होते. तरनी सुन घरात पन् पोरगं ईबलिसा सारखं वागते. ह्या कायजीनं थे बुडाबुडी पिसाटले होते. अजाबच्या मायले म्हनजे कमलाले काह्ही सुचेना. एका दिशी फनंप-हाटी येचाले कमला पेरमीलाच्या वावरात गेली. तीच्या तोंडावर कायजीचं कायशार ढग पाहूनं पेरमीलानं कमलाले ईचारलं...काय झालं व कमले लयचं ईचारात दिसूनं राह्यली. कायची कायजी करतं वं. तोंड पाह्यनं कस कायजीनं कोयश्यावानी कायठिक्कर पळ्ळ माय बाई. कमलानं पोराची सारी हकीकत पेरमीलाले कथनं केली. अन् कानात कुजबुजत एक मंतर देल्ला. कारनं वावरात तुंग्याच्या बाया असल्यानं. कमलाचा चेहरा हरिकला. कमला लगबगीनं घरी आली. सुनीनं चा ठेवला. हातपाय खापरीनं घासूनं चूय भरूनं कमला वसरीत बसली. चा पानी झालं. सुनीचा इरलेला मुखळा पाहूनं कमलाले खराब वाटे. ईमलानं सुन चंद्रकलाले हाताचा ईशारा करूनं घराच्या मांग नेलं. जश्या थ्या मांग गेल्या चंद्रकलाचा गुवानं पाय भरला. तीनं मातीत पायं घासला. कमलानं चंद्रकलेच्या कानात पेरमीला नं सांगतलेली गोठ सांगतली. चंद्रीचा मुखळा खुलला. तीनं मानीनं सासूले होकार दर्शवला.

चंद्रकलानं पोटाले सुतईनं ऊस्ती बांधली. अन् वदरूनं लुगळ्याचा शेव घेतला... अन् ऊगाम गाचं बोंबलाले लागली. कमलानं अजाबले ऊठोलं पन् थो काह्ही केल्या ऊठेना. तीनं घळ्ळीभर पानी त्याच्या तोंडावर वतलं अन् कलोय केला. अजाब खळबळूनं जागी झाला. त्याले वाटलं कोनी मेलचं कायं. काय झालं व मा कामूनं यवळी अळ्ळावूनं राह्यली. अरे बाबू तुह्या बायकोचे नव मयने नव दिवस भरले जाय लवकर थ्या झीबा दायीनले बलावूनं आनं लवकर. नाह्हीत त्वाली बायको आता मरते. मायचे बोलं आयकूनं अजाबची झोप कोसो दुर पयाली. थ्याचं मन थ्यालेचं खाये... लेक आपनं त चंदा ले बोटही लावलं नाही मंग पोट कस आलं...ह्या एकाचं ईचारानं थो भन्नावूनं गेला . चंद्राचं लळनं अन् मायचा कलोय पाहूनं अजाब अचंबित झाला. दा वरीसाबाद त्यानं ऊंबयाच्या बाहेरी पाय टाकला होता. ऊनं थ्याच्या डोयाले अन् पायाले सोसवल्या जायेना. तरी थो धावत- पयतच झीबा बुडीच्या घरी गेला.

आजी ओ ऽऽऽ आजी कवाळ खोलं व लवकर. झीबानं लय वरशाबाद अजाबले आंगनात आलेलं पाह्यलं. काय रे अजाब कामूनं इतला अळ्ळावूनं राह्यला रे. अव आजी माह्या बायकोचं पोट दुखू राह्यलं. तीले लयचं तरास होवूनं राह्यला. लेकरू पोटात फिरलं वाटते. चल बरं लवकर. बुडी गालात हासली. मनातल्या मनात सोतालेचं म्हनू लागली ... लगनाले त मयनाही नाह्ही झाला माय अन् पोट दुखूनं राह्यलं. कोनाचं पाप मारलं अजाबच्या माथी काजूनं... अशी बुडी सोताशीचं म्हनत टायवरी घालूनं अजाबच्या मांगमांग चालतं त्याच्या घरी आली. कमलानं झीबाले घरात घेतलं. अजाबले बाहेरी काहाळलं. अन् कमलानं सारी हकीकत झीबाले सांगतली. या तिघीची नाटक जो-यात चाललं होतं. अजाबचा बुडा संध्याकाय झाल्यानं थकूनभागूनं वावरातूनं आला. जसा आंगनात शिरला तशी सारी बायतपनाची सारी हकीकत अजाबनं बुड्याले सांगतली. बुड्यानं डोक्शावर हात मारला थ्याच्या आंगात अवसानं ऊरलं नाही थो फटकन् खाली बसला.

बैलाच्या कसांड्याचा अवाज कमलाच्या कानात जसा घुमला तशी कमला बाहेर आली. एकांगी नव-याले घेवूनं तीनं सारी नाटकाची हकीकत सांगतली . बुड्याचा मुखळा खुलला. ईकळे अजाब कायजीत पळळा आपनं त हातही लावला नाही मंग हे कस ह्या एकाचं ईचारानं अजाब पिसाटला होता. झीबानं कमलाले एक युक्ती सुचोली. ईम लाच्या सुनीले हप्यत्याभर आंधीचं पोरगी झाल्ती थ्या लेकराले लपत छपत घरात आनाची तीनं शक्कल लळोली. अजाबच्या बुड्यानं अजाबले गोष्टीत गुतोलं. तालगीत लपवूनं पोरगी घरात आनली. झीबानं पोरीले झपीतूनं जागी करूनं बारीकसा लिचोंडा घेतला. पोरगी टेंबलाले लागली. झीबाबुडीनं ऊगामुगाचं न्हानीत जावूनं नांदीत हातपाय धुतले अन् अजाब जौळ यावूनं म्हनते कशी....

अज शुक्कीरवार मुर्चापूरचा बजार...जिल्बी आन् बापा तुले पोरगी झाली..अजाब लयचं कायजीत पळळा होता. काय कराव थ्याले सुचेना. हात लावला नाह्ही, नव मयने झाले नाही अन् लेकरू झालं तरी मंग कस्....मांगच्या दारानं पोरगी ईमलाच्या घरी पोस्त केली. घरात बायको चंद्रकला, बुडा, बुडी तिघही हासत होते. अजाबले घरात पाय ठेवाची लाज वाटत होती. त्याले त्याच्या अयदीपनाचा राग येत होता. त्याचा राग डोक्शावरूनं वाह्यत होता. थो रागारागानं घरात शिरला. रागानं चंद्रकला माय बापाकळे पाह्यत होता. चंद्रकलानं हासत हासत पोटावर सुतईनं बांधलेली ऊस्ती सोळली. तिघही अजाबकळे पाहूनं हासतं होते. अजाबच्याही गालावर हासू फुलायसारखं फुललं होतं.

तव्हापासूनं अजाबचा अयदीपना पारं गावाच्या शीवापासूनं दूरदूर पयाला होता. आता थो रोज पायटीचं ऊठून वावरात जाये. दिवसभर काया मातीत घाम गाये. कष्ट करूनं गावातला सा-यात शीरीमंत म्हनून अजाबची ओयख निर्मानं झाली व्होती. आता त्याच्या नावापुळचं अयदी अभूषनीय दुषनं काहाळूनं 'कष्टाळू' अजाबराव हे भूषनं लागलं होतं. अशी होती आजाबची कायनी. ' आम्ची कायनी सरो अन् तुम्च पोटं भरो....'

– सु. पुं. अढाऊकर
अकोला
मो. ९७६९२०२५९७

मी शांतता आहे

हात सोडू नकोस उगीच माझा,
मी शांतता आहे, माझी गरज
नसल्याचा आव आणू नकोस,
इतिहासाची पाने चाळून पहा,
समजेल तुला माझे महत्व.
अनेकांनी अनेक लढाया, मला
शस्त्र बनवून जिंकल्या,
अनेक शत्रुंनी हिंसा सोडली
माझ्यामुळे, शांतता आहे मी,
माझा स्वीकार कर, आधुनिक
माणूस म्हणून उगाच मिरवू
नकोस, चार चौघात,
हात सोडू नकोस उगीच माझा.
मी गांधी, मी बुद्ध
मीच यशू आहे, हे
ध्यानात धर, बाहेरच्या अर्थहीन
कोलाहलात,नकोस
अडकवू स्वतःला, तुझ्या
हृदयात माझे पालन कर,
मी शांतता आहे....तुला
अमूर्त विजयाकडे नेणारी,
हात सोडू नकोस उगीच माझा.

अमित शिंदे
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

हरवलाय माणूस


माणसाच्या गर्दीत माणूस
आता माणुसकीला विसरलाय
पैशाच्या जोरावर उडतो आता
मात्र अहंकारात चडलाय
बांधून ठेवली मोठी इमारत
स्टाईल देखील लावली घराला
हम दो हमारी दो म्हणून
आईला पाठवले वृद्धाश्रमाला
विज्ञानाच्या दुनियेत
त्याने घेतली गगन भरारी
माणुसकीचं नातं मात्र
विसरून गेला सारी
शेती करायची त्याला
आज बघ ना लाज वाटते
भुई वर वाढलेल्याला
बघ ना पैश्याची खाज सुटतेय
घराचं घरपण गेलं
गेली आता संस्कृती
इतकं सारं कमावलं त्यानं
विसरून गेला नातीगोती
आईचं झालं मम्मा
पप्पा बाबा च झालं
आजी आजोबा दिसे ना
त्यांना मात्र वृद्धाश्रमात धाडल
हरवली सारी
आपुलकीची नाती
प्रेम दिसे ना खरे इथे
दिसे ना कुठे सांगाती

–प्रतीक्षा गजानन मांडवकर
यवतमाळ
मो. ८३०८६८४८६५

अक्षरगोदा

वास्तवाची जाणीव करून देणारी फ. मुं. ची कविता

सु. मा. कुलकर्णी, नांदेड



प्राचीन काळी ऋषीमुनींनी पर्जन्यसूक्त रचली होती. तेव्हा ग्लोबल वार्मिंग, अल निनो काही नव्हते. आज राज्यात प्रचंड दुष्काळ पडला आहे. पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांना रब्बीच्या पेरण्या होऊ शकल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर आज 'अक्षर गोदा' मध्ये कविवर्य फ. मुं. शिंदे यांच्या 'खरे खोटे' या कवितेचे आस्वादात्मक रसग्रहण करीत आहे.

खरे खोटे
वाट पाहून थकले
रिक्त रिकामे मडके
सरीचे ठाऊक सरीस
कुठे जीवही अडके
नसते पैशाचे खरे
नसे पाऊसही खोटा
पावसाहूनही कधी
गडगडाटातच मोठा
संगनमताने त्यांच्या
धुंद धारा आणि वारा
कोसळे केविलवाणे
झाड देत आले थारा
त्याचे त्याला झरू द्यावे
कशासाठी साठवावे
रूपांतरच आपल्या का
आसवांनी आठवावे
फ. मुं. शिंदे

'येरे येरे पावसा, तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा'

या बालपणी आळवलेल्या ओळींच्या आठवणी मनात रेंगाळत आहेत. बालपणी ही ओळ आपण निरागसपणे म्हणायचो. पावसाला पैसा देणं, ही आपली बालबुद्धी होती. पावसाला विकत घेता येतं, असा तो भोळा व्यवहार. त्यात लोभ नव्हता, हट्ट होता. पाऊस यावा, अंगणात टपोऱ्या थेंबांच्या सरी पडाव्यात, पाण्याचे ओहोळ वाहू लागावेत आणि कागदी होड्या बनवून सोडव्यात, एवढीच अपेक्षा असायची. पण आज पावसाचं रेशनिंग झालं आहे. तुरळक हलका पाऊस पडतो तेव्हा त्या ओळीचा अर्थच बदलून गेलेला दिसत आहे.

आज आपण खरंच पावसाला पैसा देतोय. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठीही पैसाच लागतो. धरणांसाठी पैसा, टँकरसाठी पैसा, पीकविम्यासाठी पैसा. तरीही पाऊस आपल्या मुठीत येत नाही. 'मेरी मर्जी' असे म्हणतच तो पडतो. बालपणी आपण पावसाला पैशाचं आमिष दाखवायचो, आज पाऊस आपल्याला पैशाची किंमत दाखवतोय. लहानपणी पैसा म्हणजे चिंचोक्याच्या आकाराचा खेळातला पैसा होता. ढब्बू पैसा, आज पैसा म्हणजे शेतकऱ्याच्या कर्जाचं व्याज आहे, शहरातल्या नाल्यांसाठी मंजूर झालेला निधी आहे. पाऊस एकाच वेळी दोन रूपं दाखवतो. कुठे तो येतच नाही म्हणून शेती करपते, आणि कुठे तो इतका येतो की, घरातलं धान्य वाहून जातं. तिथे आपलं बालगीत थिजून जातं.

येरे येरे पावसा म्हणताना बालपणी आपण पावसाला बोलावत होतो. आज आपण पावसाला घाबरूनही म्हणतोय, ये पण जपून ये. कारण आजचा पाऊस फक्त अंगण भिजवत नाही, तो जीव घेतो, पूर आणतो, रस्ते खचवतो. खरं तर त्या बालकवितेत एक मोठं तत्त्वज्ञान दडलंय. निसर्गाशी असलेलं आपलं नातं हे देवाण-घेवाणीचं नाही, ते संवादाचं आहे. आपण त्याला पैसा देऊ शकत नाही, आपण फक्त त्याला विनवू शकतो. येरे म्हणू शकतो. बालपणीची ती विनवणीच खरी होती. आजच्या पावसाच्या संदर्भात तीच ओळ आपल्याला आरसा दाखवते. आपण कितीही श्रीमंत झालो तरी पावसाचा एक थेंब आपण बनवू शकत नाही, आणि त्याचा एक पूर आपण थांबवू शकत नाही. त्याच्यापुढे आपण आजही तेच लहान मूल आहोत, अंगणात उभं राहून आभाळाकडे बघणारं. फक्त आता आपल्या हातात कागदी होडी नाही, हातात मोबाईलवरचा हवामानाचा अंदाज आहे, आणि मनात उद्याची काळजी आहे. आता 'खरे खोटे' कवितेचा कडव्यानुसार आस्वाद घेऊ.

'खरे खोटे' ,
फ. मुं. शिंदे

ही कविता पावसाबद्दल नाही, पावसाच्या प्रतीक्षेबद्दल आहे, आणि प्रतीक्षा हीच महाराष्ट्राची आजची सगळ्यात मोठी सत्यता आहे.

आरंभ : वाट पाहून थकलेले मडके
वाट पाहून थकले
रिक्त रिकामे मडके

कवितेची सुरुवातच एका दृश्याने होते रिकामे मडके. हे मडके फक्त घरातले भांडे नाही. तो शेतकऱ्याचा शेततळा आहे, गावचा तलाव आहे, विहीर आहे, धरण आहे. आज महाराष्ट्रात ३५८ पैकी ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला आहे. यंदा नैऋत्य मान्सून-मध्ये सरासरी ९९४.५ मि. मी. ऐवजी फक्त ८०४.४ मि.मी. पाऊस पडला. म्हणजे आकाशाने दिलेले आश्वासनच अपुरे पडले. त्यामुळे हे मडके केवळ रिकामे नाही, ते वाट पाहून थकलेले आहे. वाट पाहणे हाच इथला दुष्काळ आहे.

सरीचे ठाऊक सरीस
कुठे जीवही अडके
सरीला आपले ठिकाण माहीत आहे, पण जीवाला कुठे अडकावे हेच कळत नाही. ही ओळ आजच्या शेतकऱ्याची मानसिक अवस्था सांगते. पाऊस येईल की नाही, पीक जगेल की नाही, कर्ज फिटेल की नाही या अनिश्चिततेत जीव अडकून पडला आहे.

खरे-खोटे : पावसाचे तत्त्वज्ञान
नसते पैशाचे खरे
नसे पाऊसही खोटा
पावसाहूनही कधी
गडगडाटातच मोठा

इथे कवी एक फार मोठे सत्य सांगतो. पैसा खरा नसतो, कारण पैशाने पाऊस विकत घेता येत नाही, आणि पाऊस खोटा नसतो, कारण तो आला नाही तरी त्याची अनुपस्थितीच खरी असते.

आजच्या दुष्काळात हेच दिसते. सरकारने १२ कलमी मदत पॅकेज जाहीर केले, १६ ऑक्टोबरपासून पाण्याच्या वापरात किमान १०% कपात जाहीर केली. पण या सगळ्या घोषणा, गडगडाट, ह्या पावसाहून मोठ्या झाल्या आहेत. गडगडाट म्हणजे आश्वासने, आकडेवारी, बैठक. पाऊस म्हणजे प्रत्यक्ष पाणी. कवी म्हणतो, आपण गडगडाटातच मोठे झालो आहोत, पावसात नाही. ही कविता कुणावर टीका करत नाही, ती आपल्या सामूहिक सवयीवर बोट ठेवते. आपण पावसाची वाट पाहतो, पण पाऊस येण्यासाठी काही करत नाही.

संगनमत : निसर्गाची क्रूर मैत्री
संगनमताने त्यांच्या
धुंद धारा आणि वारा
कोसळे केविलवाणे
झाड देत आले थारा

इथे कवितेत एक विलक्षण प्रतिमा येते. धारा आणि वारा यांनी संगनमत केले आहे. ते एकत्र येऊन कोसळतात. पण ते कोसळणे केविलवाणे आहे, दयनीय आहे. कारण त्यांना थारा देणारे झाडच आता उरलेले नाही. दुष्काळात हेच होते. पाऊस जेव्हा येतो, तेव्हा तो एकदम कोसळतो, वाहून जातो. त्याला अडवणारी झाडे, जमिनीतील ओलावा, पाणलोटाची रचना सगळे संपलेले असते. झाडाने थारा दिला, पण आपण झाडालाच थारा दिला नाही. ही ओळ पर्यावरणाच्या ऱ्हासाची शोकांतिका आहे. मराठवाड्यात ३०-३८% पेक्षा जास्त आणि विदर्भात २३-२७% पावसाची तूट आहे, सोयाबीन, कापूस, तूर या खरीप पिकांचे नुकसान झाले आहे, असे अहवाल सांगतात. म्हणजे झाडच नाही, तर पीकही थारा देऊ शकले नाही.

शेवट : साठवू नकोस, झरू दे
त्याचे त्याला झरू द्यावे
कशासाठी साठवावे
रुपांतरच आपल्या का
आसवांनी आठवावे

ही कवितेची सगळ्यात महत्त्वाची आणि सगळ्यात अवघड ओळ आहे. दुष्काळात आपण पाणी साठवण्याबद्दल बोलतो. धरणे, टाक्या, बाटल्या. पण कवी म्हणतो, पावसाला साठवू नकोस, त्याला झरू दे. म्हणजे काय? साठवणे म्हणजे भीती. झरणे म्हणजे विश्वास. पाणी साठवले की ते अडते, सडते, भांडणाचे कारण होते. पाणी झरले की ते जमिनीत मुरते, विहिरीत येते, पुढच्या पिढीसाठी राहते. आणि शेवटची ओळ आपल्या आसवांनीच आपल्याला आठवावे ही दुष्काळाची सगळ्यात वेदनादायी व्याख्या आहे. जेव्हा पाऊस आठवत नाही, तेव्हा आपली आसवे आपल्याला पावसाची आठवण करून देतात. आपले रडणेच आपला पाऊस होतो. सप्टेंबरमध्येच विहिरी, तलाव आटलेले, पुढील पावसाळ्यापर्यंत आठ-नऊ महिने कोरड्या स्रोतांवर काढावे लागणार आहेत, अशी स्थिती यंदा आहे. अशा वेळी आसवे हेच शेवटचे पाणी उरते का, असा प्रश्न ही कविता विचारते. ही कविता आज का जास्त बोचते?

ही कविता दुष्काळाचे वर्णन करत नाही, ती दुष्काळाच्या मानसिकतेचे वर्णन करते. मडके रिकामे आहे, पण आशा अजून शिल्लक आहे. पैसा खोटा आहे, पाऊस खरा आहे. गडगडाट मोठा आहे, पाऊस लहान आहे. झाड थारा देते, पण आपण झाडाला थारा देत नाही.

आज महाराष्ट्रावर कोसळलेला दुष्काळ हा फक्त पावसाच्या तुटीचा नाही, तो थारा न देण्याचा दुष्काळ आहे. आपण निसर्गाला थारा दिला नाही, म्हणून निसर्गाने आपल्याला थारा दिला नाही.

फ. मुं. शिंदे यांची ही कविता आपल्याला शेवटी एकच शिकवते पावसाची वाट पाहून थकू नका, पावसाला झरू द्या. म्हणजे जमीन ओली करा, झाड जगवा, पाणी मुरू द्या. नाहीतर पुढच्या वर्षीही आपल्याला आपल्याच आसवांनी पावसाची आठवण करावी लागेल.

डायबेटीक रेटीनोपॅथी (डोळ्याचा एक आजार)

डोळा हा ज्ञानेंद्रीय आत्म्याचा आरसा समजला जातो. बरेच समज, भाव हे डोळ्याद्वारे मेंदुपर्यंत पोहोचतात. आपण आनंदी आहोत की दुःखी, भयभीत आहोत का रागावलेले, हे आपले डोळे समोरच्या व्यक्तीशी संवाद साधतात. अशा या महत्वाच्या ज्ञानेंद्रीयाला मोतीबिंदू, काचबिंदू अम्लायोपिया, तिरळेपणा, बुब्बुळाचे आजार इत्यादी कारणांमुळे अंधत्व येण्याची काळजी असते. त्यातच सध्या मधुमेही व उच्च रक्तदाब यामुळे डायबेटीक रेटीनोपॅथी हा आजार अत्यंत तीव्र गतीने वाढत आहे. यामुळे डोळ्यासाठी डोळ्यासमोर गंभीर स्वरूप धारण होत आहे.

मधुमेही रुग्णांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण आटोक्यात न ठेवल्यास डोळ्यातील रेटीनाच्या (मागील पडद्याच्या) अतिसुक्ष्म रक्तवाहिन्यांमधून रक्तस्राव (लिकेजेस) होवून रेटीनाच्या पेशींना प्रोटीन्स व ऑक्सीजन सारखे घटक मिळत नाहीत. परिणामी रेटीनाला सुज पण येवू शकते व रेटीनाचा काही भाग निकामा पण होवू शकतो. यामुळे प्रामुख्याने अंधत्व येण्याची जास्तच शक्यता निर्माण होते. या सर्व गुंतागुंतीच्या समस्येला डायबेटीक रेटीनोपॅथी म्हणून गणल्या जाते. हे दुष्टचक्र दुर्लक्ष्यामुळे असेच चालु राहीले तर कालांतराने रेटीणावर ताण पडून डोळ्याकडून मेंदूकडे दृष्टीचे संवेदना वाहून नेणारी जी दृष्टीचेता नावाची नस असते ती पण निकामी बनून कायमस्वरुपी अंधत्वाला सामोरे जावे लागते.

मधुमेह किंवा उच्च रक्तदाब असणाऱ्या रुग्णांना त्यांच्या रेटीनावरील रक्तस्राव दूर करण्याकरीता फोटो कॉग्युलेशन या लेजर सर्जरीद्वारा किंवा कार्टीकोस्टीरॉईडस् सारखे इंजेक्शन देवून उपचार केले जातात.

याशिवाय मधुमेह व उच्च रक्तदाब नियंत्रीत ठेवण्यासाठी, रेटीनावरील सुज कमी करणेसाठी औषधोपचार योजले जातात. मधुमेहाचा ईतिहास व लक्षणे यावरुन फ्लोरोसीन सिहरन्स अँजीओग्राफी किंवा ऑप्टीक कोहेरन्स (OCT) टेस्ट यावरुन डायअबेटी रेटीनोपॅथीचे निदान केल्या जाते. ज्यामुळे मधुमेह असलेल्या रुग्णांनी वर्षभरातून किमान एकदा तरी नेत्रतज्ज्ञांकडून आपल्या डोळ्यांची तपासणी करुन घेणे उत्तमच.

प्रथमच अमेरीकेच्या अन्न व औषध प्रशासनाने (FD) देशाच्या बाजारपेठेत कृत्रिम बुध्दीमता यावर आधारीत उपकरणांच्या विपणनाला परवानगी दिली असून हे उपकरण मधुमेहामुळे होणाऱ्या डोळ्यांच्या विकारांचे निदान करण्यासाठी उपयोगात येते. खऊद-डडउ या वैद्यकीय उपकरण कंपनीने ID DR उपकरण विकसीत केले आहे. IDX-DR (आय.डी.एक्स.-डी.आर.) नामक हे उपकरण एक सॉफ्टवेअर प्रोग्राम आहे, जे कॅमेऱ्याद्वारे डोळ्यांच्या रेटीनाच्या प्रतिमांचे विश्लेषण करण्यासाठी कृत्रिम बुध्दीमता यावर आधारीत वापर करतो.

संतुलित जीवनसत्वयुक्त योग्य आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, कोलेस्ट्रॉल, उच्च रक्तदाब व मधुमेहावरील नियमित योग्य औषधोपचार, अल्कोहोल, तंबाखु, स्मोकींग यांसारख्या व्यसनांपासून कोसोदूर अशी ही जीवनशैली डायबेटीक रेटीनोपॅथी आजाराला आळा घालण्यासाठी उत्तम ठरते.

–एल. जी. चंदनकर
नेत्र चिकित्सा अधिकारी
जिल्हा रुग्णालय, नांदेड.

पाच वर्षांखालील बालकांना न्यूमोनियापासून वाचवा; लक्षणे दिसताच तातडीने उपचार घ्या!

'सांस' अभियानातून नांदेड जिल्ह्यात जनजागृतीवर भर; बालमृत्यू रोखण्यासाठी आरोग्य विभाग सज्ज

नांदेड (प्रतिनिधी)– पाच वर्षांखालील बालकांमध्ये न्यूमोनियामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने नांदेड जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'सांस' (SNS-Social wareness and ction to Neutralize Pneumonia Successfully) अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून बालकांमधील न्यूमोनियाची लक्षणे वेळीच ओळखणे, तातडीने निदान व उपचार उपलब्ध करून देणे आणि पालकांमध्ये जनजागृती करणे यावर विशेष भर दिला जात आहे. पालकांनी पाच वर्षाखालील बालकांच्या आरोग्याबाबत सतर्क राहून न्यूमोनियाची लक्षणे दिसताच जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केले आहे.

न्यूमोनिया बालमृत्यूचे प्रमुख कारण; वेळीच उपचार महत्त्वाचे

राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माहितीनुसार देशात पाच वर्षांखालील बालकांच्या मृत्यूंपैकी सुमारे १५ टक्के मृत्यू न्यूमोनियामुळे होतात. योग्य पोषण, नियमित लसीकरण, स्वच्छता, प्रदूषणापासून संरक्षण आणि वेळेवर निदान व उपचार या उपाययोजनांमुळे न्यूमोनियामुळे होणारे अनेक बालमृत्यू टाळणे शक्य आहे. त्यामुळे पालकांनी बालकांच्या आरोग्यातील अगदी लहान बदलांकडेही दुर्लक्ष करू नये.

वयानुसार न्यूमोनियाची लक्षणे ओळखा!

बालकांना न्यूमोनिया झाल्यास त्यांच्या वयानुसार श्वासोच्छ्वासाचा वेग वाढणे, छाती आत ओढली जाणे, दूध पिण्यास त्रास होणे आणि सुस्ती येणे अशी लक्षणे दिसू शकतात.

० ते ५९ दिवसांचे नवजात बालक : एका मिनिटात ६० किंवा त्यापेक्षा जास्त श्वास घेणे. स्तनपान करता न येणे किंवा दूध पिण्यास त्रास होणे. ताप येणे किंवा शरीर थंड पडणे. हालचाल कमी होणे अथवा असामान्य सुस्ती येणे. आकडी येणे किंवा श्वास घेण्यास त्रास होणे.

२ महिने ते १२ महिने वयोगट : एका मिनिटात ५० किंवा त्यापेक्षा जास्त श्वास घेणे. श्वास घेताना छाती आत ओढली जाणे. दूध पिण्यास त्रास होणे किंवा बालक सुस्त होणे.

१२ महिने ते ५ वर्षे वयोगट : एका मिनिटात ४० किंवा त्यापेक्षा जास्त श्वास घेणे. श्वास घेण्यास त्रास होणे किंवा छाती आत ओढली जाणे. खाणे-पिणे बंद होणे, उलट्या होणे किंवा बालक सुस्त होणे. यापैकी कोणतेही गंभीर लक्षण दिसल्यास घरगुती उपचारांवर अवलंबून न राहता बालकाला तातडीने शासकीय आरोग्य संस्थेत घेऊन जाणे आवश्यक आहे. न्यूमोनिया प्रतिबंधासाठी '३ पी' त्रिसूत्रीचा अवलंब करा! 'सांस' अभियानांतर्गत संरक्षण, प्रतिबंध आणि उपचार या तीन प्रमुख बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

संरक्षण : जन्मानंतर पहिले सहा महिने बालकाला केवळ मातेचे दूध द्यावे. सहा महिन्यांनंतर स्तनपान सुरू ठेवून वयानुसार योग्य पूरक आहार द्यावा. तसेच बालकाला नियमानुसार जीवनसत्त्व 'अ'ची मात्रा द्यावी.

प्रतिबंध : बालकाचे PCV, Hib, गोवर तसेच राष्ट्रीय लसीकरण वेळापत्रकानुसार सर्व लसीकरण पूर्ण करावे. बालकाला हाताळण्यापूर्वी हात साबणाने स्वच्छ धुवावेत. घरातील धूर, धूम्रपान आणि हवेचे प्रदूषण टाळावे. घरात स्वच्छता राखून पुरेशी हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.

मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू

नांदेड (प्रतिनिधी) –मत्स्य-व्यावसायिकांचे जीवनमान उंचावणे, आर्थिक समृद्धी साधणे, रोजगार व उद्योजकतेला चालना देणे तसेच मत्स्यव्यवसायातून शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शासनामार्फत मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मत्स्यव्यवसाय विभागाच्या विविध २३ योजनांसाठी महाडीबीटी २.० प्रणालीवर ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील पात्र मत्स्यव्यावसायिक, मच्छीमार, मत्स्यकास्तकार तसेच मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था पदाधिकारी, सभासदांनी जास्तीत जास्त ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय नांदेड कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते २८ ऑक्टोबर २०२६ रोजी महाडीबीटी २.० प्रणालीवर अर्ज स्वीकारण्याच्या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. या योजनांमध्ये भूजलाशयीन मत्स्यव्यवसायासाठीच्या राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय योजनांचा समावेश असून, पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेता येणार आहे.

याशिवाय मच्छीमारांना मासेमारी परवाना वितरणाची सेवाही ऑनलाईन करण्यात आली आहे. या डिजिटल प्रक्रियेमुळे लाभार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. उपलब्ध शासकीय डेटाबेसच्या आधारे लाभार्थ्यांच्या माहितीची पडताळणी करण्यात येणार आहे. तसेच योजनेंतर्गत मंजूर होणारे अनुदान लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट ऑनलाइन जमा करण्यात येणार असून, संबंधित सेवांची प्रमाणपत्रेही ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

सत्कार नको, शेतकऱ्यांना पीक कर्ज द्या; आ. जितेश अंतापूरकर यांचे बँक अधिकाऱ्यांना निर्देश



शंकरनगर (प्रतिनिधी)– देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील शेतकरी सध्या दुष्काळाच्या गंभीर संकटाला सामोरे जात असून, आर्थिक अडचणींमुळे हवालदिल झाले आहेत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांचे प्रश्न प्रलंबित असताना सत्कार स्वीकारणे योग्य नाही. जोपर्यंत शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळविताना येणाऱ्या अडचणी दूर होत नाहीत, तोपर्यंत सत्कार स्वीकारणार नाही, अशी भूमिका आमदार जितेश अंतापूरकर यांनी घेतली.

शुक्रवारी (दि. १३ नोव्हेंबर) आमदार अंतापूरकर यांनी रामतीर्थ (ता. बिलोली) येथील भारतीय स्टेट बँकेच्या (एसबीआय) शाखेला भेट देऊन बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली. शासनाच्या कर्जमाफी योजनेत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना अनावश्यक तांत्रिक अडचणी न सांगता तातडीने नवीन पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी शाखा व्यवस्थापकांना दिले.

परिसरात निर्माण झालेली दुष्काळजन्यपरिस्थिती, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, शेतीचा वाढता खर्च आणि उत्पन्नातील घट यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा कठीण काळात बँकांनी शेतकऱ्यांना सहकार्य करणे आवश्यक आहे. विशेषतः कर्जमाफी योजनेत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज देताना येणाऱ्या अडचणी तातडीने दूर कराव्यात, अशी आग्रही भूमिका आमदारांनी मांडली.

दरम्यान, आमदारांच्या स्वागतासाठी बँकेच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, मतदारसंघातील शेतकरी दुष्काळाच्या झळा सोसत असताना आणि पीक कर्जासाठी बँकेच्या चकरा मारत असताना आमदार अंतापूरकर यांनी सत्कार स्वीकारण्यास नकार दिला. माझ्या मतदारसंघातील शेतकरी संकटात असताना मी सत्कार स्वीकारणार नाही. शेतकऱ्यांच्या पीक कर्जाचे प्रश्न मार्गी लागणे हेच माझ्यासाठी महत्त्वाचे आहे, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी यावेळी मांडली.

पीक कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांच्या नावाखाली शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशा सूचना आमदार अंतापूरकर यांनी एसबीआयचे फिल्ड ऑफिसर नागेश कत्ते यांना दिल्या. बँकेच्या कर्मचाऱ्यांनी गावोगावी जाऊन शेतकऱ्यांच्या भेटी घ्याव्यात, कर्जप्रक्रिया सुलभ करावी आणि पात्र शेतकऱ्यांना विनाकारण बँकेच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी आवश्यक सहकार्य करावे, असेही त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सांगितले.

याप्रसंगी किनाळा येथील सरपंच विठ्ठल माने, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष ब्रह्माभाऊ रामतीर्थकर, सरपंच तिरुपती डाकोरे, आकाश कोकणे, बाबाराव रोकडे, लक्ष्मण पाटील देगलुरे, मुरलीधर देगलुरे, संतोष भक्तापुरे, श्याम पाटील तोडे यांच्यासह परिसरातील शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

रब्बी हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभागी होण्याचे आवाहन

नांदेड (प्रतिनिधी)– राज्य शासनाने रब्बी हंगाम २०२६-२७ साठी अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी एल निनोच्या प्रभावामुळे निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी या योजनेत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे. नुकसानीपासून शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण व्हावे, यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन अर्धापूरचे तालुका कृषी अधिकारी विशाल बिऱ्हाडे यांनी केले आहे.

या हंगामात गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, रब्बी मका, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमूग व रब्बी कांदा या सात पिकांचा समावेश करण्यात आला आहे. अधिसूचित महसूल मंडळ व क्षेत्रातील शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होता येणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी पीकनिहाय अंतिम मुदती निश्चित करण्यात आल्या आहेत. रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत) पिकासाठी ३० नोव्हेंबर २०२६, तर गहू (बागायत), हरभरा, रब्बी मका व रब्बी कांदा या पिकांसाठी १५ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत आहे. तसेच उन्हाळी भात व उन्हाळी भुईमूग पिकांसाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत विमा नोंदणी करता येणार आहे.

कर्जदार शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित बँकेमार्फत मुदतीत सादर करणे आवश्यक आहे. योजनेत सहभागी व्हायचे नसल्यास अंतिम मुदतीच्या सात दिवस आधी संबंधित बँकेस लेखी कळविणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या https://pmfby.gov.in या संकेतस्थळावर स्वतः नोंदणी करता येईल. तसेच संबंधित बँका, विमा कंपनीचे नियुक्त प्रतिनिधी, क्रॉप इन्शुरन्स प आणि सामूहिक सेवा केंद्र (उडउ) यांच्या माध्यमातूनही नोंदणीची सुविधा उपलब्ध आहे. भाडेपट्ट्याने किंवा बटाईने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही योजनेत सहभागी होता येणार आहे.

२५ वर्षांची परंपरा कायम; दीपावली पाडव्यानिमित्त आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी घेतल्या व्यापाऱ्यांच्या भेटी



लोहा (प्रतिनिधी)– दिवाळी पाडव्यानिमित्त आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी लोहा शहरातील व्यापाऱ्यांच्या भेटी घेऊन दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या. शहरातील व्यापाऱ्यांच्या भेटी घेण्याची ही परंपरा गेल्या २५ वर्षांपासून कायम आहे.

आ. प्रतापराव पाटील व लोह्यातील छोटे-मोठे सर्व व्यापारी यांचे नाते तसे दृढ आहे. कठीण काळात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची व्यापाऱ्यांना मदत होते तर त्यांच्या कधी अडचणीच्या प्रसंगी व्यापारी प्रतापरावांना साथ देतात. त्यामुळे हा ऋणानुबंध केवळ प्रारंभिक राहत नाही. याचा अनेकदा अनुभव लोह्यावासियांनी घेतला आहे. आमदार-खासदार असो अथवा नसो, ते हमखास दिवाळी पाडव्यानिमित्त व्यापाऱ्यांच्या भेटीला येत असतात.

मंगळवारी (ता. १० नोव्हें) आ. प्रतापराव पाटील यांनी मार्केट यार्ड, मुख्य रोड येथील व्यापारी प्रतिष्ठाणास भेटी दिल्या. त्यांचे जागोजागी व्यापाऱ्यांनी जंगी स्वागत केले. फटाक्यांची आतिषबाजी केली. यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पवार, सचिन पाटील चिखलीकर, साकिरराव मुक्तर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष करिम शेख, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, माजी पं. स. सभापती आनंदराव पाटील, बालाजी पाटील मारतळेकर, माजी उपनगराध्यक्ष दत्तराव वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, गटनेते भास्कर पवार, नगरसेवक श्याम पाटील पवार, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नामदेव कटकमवार, साहेबराव काळे, डॉ. लक्ष्मीकांत लव्हेकर, माजी सरपंच बाबाराव पाटील गवते, माजी सरपंच मारोतराव पाटील बोरगावकर, बालाजी खिल्लारे, बालाजी कळकेकर, राजेश बोडके, पंकज परिहार, तुकाराम दाढेल, माजी सरपंच बालाजी पाटील बोरगावकर, अन्वर शेख, कृउबा माजी उपसभापती अण्णाराव पाटील सायळकार, माजी सरपंच राम पाटील कारेगावकर, ननामदेव पाटील पवार, शहाजी पवार, सूर्यकांत पार्डीकर, प्रवीण धुतमल, सचिन मुकदम यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकार उपस्थित होते.

सारनाथ बुद्ध विहारात आज वर्षावास व ग्रंथवाचन समारोप

नांदेड (प्रतिनिधी)– येथील सावित्रीबाई फुले नगरातील सारनाथ बुद्ध विहार येथे वर्षावास व ग्रंथवाचन समारोप समारंभ रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे.

वर्षावास व ग्रंथवाचन समारोपानिमित्त आयोजित कार्यक्रमात रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता पूजापाठ व ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. तर दुसऱ्या सत्रात दुपारी १ वाजता खिरदान, तिसऱ्या सत्रात दुपारी २ वाजता गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सत्काराचा कार्यक्रम पार पडणार आहे.

तसेच दुपारी ३ वाजता भन्ते विनय बोधीप्रिय यांची धम्मदेशना होणार आहे. या धम्मदेशनेनंतर सायंकाळी ७ वाजता प्रा. अविनाश नाईक यांचा बुद्ध-भीम गीतांचा प्रबोधनात्मक कार्यक्रम पार पडणार आहे. या वर्षावास व ग्रंथवाचन समारोप सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समिती व युवा मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

बरडशेवाळा येथे भूमिपुत्रांचा गौरव सोहळा उत्साहात; गरजूंना अन्नधान्य किट वाटपाने जपली सामाजिक बांधीलकी



नांदेड (प्रतिनिधी)– हदगाव तालुक्यातील बरडशेवाळा येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भूमिपुत्र डॉ. शिवाजीराव पोले यांच्या पुढाकारातून भूमिपुत्र गौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

यावेळी गावातील दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांसह यावर्षी विविध क्षेत्रात निवड झालेल्या भूमिपुत्रांचा तसेच विविध सेवेतून सेवानिवृत्त झालेल्यांचा कुटुंबासह मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

पोस्टमन बालाजीराव चौधरी, प्राचार्य बालासाहेब मस्के, एनडीसी बँक व्यवस्थापक दिलीपराव चौधरी, गणेशराव मस्के यांचा सेवानिवृत्तीनंतर विशेष सन्मान करण्यात आला.

बरडशेवाळा प्राथमिक आरोग्य केंद्राने समाधानकारक सेवेसह कामात जिल्ह्यात नावलौकिक निर्माण केल्याबद्दल तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुरमुरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. बी. भिसे, परिचर इस्माईल शेख यांचा सन्मान करण्यात आला. तसेच तामसा येथील भूमिपुत्र पंथ यांनी आठ हजारांहून अधिक शवविच्छेदन करूनही सेवानिवृत्तीनंतरही कार्य सुरूच ठेवल्याबद्दल त्यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

वैद्यकीय क्षेत्रात निवड झालेल्या निर्जन राजू चौधरी, भक्ती विनायक चौधरी, गंगासागर विनायक बेंबरकर, ग्रंथपाल शुभम रमेश तिवडकर, स्वप्नील भोजने यांच्यासह दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन डॉ. शिवाजीराव पोले, डॉ. मंगेश मस्के, दिलीपराव चौधरी, गंगाधरराव मस्के, प्राध्यापक दिगांबर सावंत या भूमिपुत्रांच्या वतीने गावातील काही गरजू कुटुंबांना अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. तसेच पिंपरखेड येथील वृद्धाश्रमास भोजन साहित्य देऊन सामाजिक बांधिलकी जोपासली.

यावेळी डॉ. संजय मुरमुरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे, डॉ. भिसे, प्रविण वडकुते हदगावकर, भूमिपुत्र शुभम तिवडकर, गावातील प्रथम शिक्षिका पूजा कदम पाटील यांनी आपल्या भावना व्यक्त करीत या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. असा प्रेरणादायी उपक्रम इतर गावांनीही आदर्श म्हणून घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी सेवानिवृत्त भारतीय सैनिक रामराव यमकुरे, प्रविण वडकुते हदगावकर, रमेश राठोड, प्रद्युम्न राठोड, सविता निमडगे पळसेकर, गजानन अनंतवार कवानकर यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, विविध क्षेत्रात कार्यरत असलेले भूमिपुत्र, सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, गावकरी, सन्मानित विद्यार्थी, पालक वर्ग, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मंडळी उपस्थित होते. सूत्रसंचालन सादुलवार यांनी केले, तर आभार प्राध्यापक दिगांबर सावंत यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार प्रभाकर दहिभाते, दिनेश दहिभाते, नागेश पोले यांनी विशेष परिश्रम घेतले.

ज्या शाळेने घडविले, तिचे ऋण फेडण्यासाठी १७ वर्षांनी पुन्हा एकत्र आले विद्यार्थी

जिल्हा परिषद हायस्कूल आष्टूरच्या २००९ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमिलन सोहळा; शाळेला दोन संगणक संच भेट, गुरुजनांचाही गौरव



नांदेड (प्रतिनिधी)– शाळेतील वर्ग, मित्रांसोबत केलेली धमाल, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शालेय जीवनातील असंख्य आठवणी... काळाच्या ओघात प्रत्येकजण आपापल्या आयुष्यात रमला; मात्र ज्या शाळेने आयुष्याला आकार दिला, त्या शाळेशी असलेले नाते कायम राहिले. याच जिव्हाळ्यातून तब्बल १७ वर्षांनंतर लोहा तालुक्यातील आष्टूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या २००९ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुट्टीत स्नेहमिलन सोहळा आयोजित केला. यावेळी शाळेला दोन संगणक संच भेट देत माजी विद्यार्थ्यांनी शाळेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा २००९ च्या बॅचच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजीराव टोम्पे होते. प्रमुख पाहुणे म्हणून गंगा हॉस्पिटलचे डॉ. प्रणव कुराडे, डी. पी. चट, बी.के. बनसोडे, रमेश बाबर, ए. व्ही. जायभाये आणि डॉ. व्ही. जी. लुंगारे उपस्थित होते. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. भागवतकार रंगदळे यांनी प्रास्ताविक केले.

१७ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. आज कोणी डॉक्टर, तर कोणी विविध कंपन्या, उद्योग, व्यवसाय आणि नोकरीच्या माध्यमातून आपापल्या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करीत आहेत. मात्र, या यशस्वी प्रवासाचा पाया शाळेतच घातला गेला असून, त्यात शिक्षकांचे योगदान अनमोल असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. शाळेचे बदललेले स्वरूप पाहूनही विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

आष्टूरच्या जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात या उद्देशाने माजी विद्यार्थ्यांनी शाळेला दोन संगणक संच भेट दिले. भविष्यात शाळेला आवश्यक मूलभूत व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही पुढाकार घेण्याची भूमिका त्यांनी मांडली. विकेश ससाणे यांनी यापुढेही शाळेला आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली, तर सुनील जोडराणे यांनीही सहकार्याचे आश्वासन दिले. शाळेच्या विकासासाठी सदैव तत्पर राहण्याचा निर्धार माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

करदोडा विक्रीतून जपली जातेय सामाजिक बांधिलकी; शेख बंधूंचा तीन पिढ्यांपासूनचा पारंपरिक व्यवसाय



नवीन नांदेड (प्रतिनिधी)– दीपावली सणाच्या निमित्ताने भाऊबीजेच्या दिवशी बहिणीकडून भावाला सन्मानाने दिल्या जाणाऱ्या 'करदोडा' विक्रीचा व्यवसाय नायगाव तालुक्यातील कहाळा येथील शेख बशीर शेख अजिज हे गेल्या तीन पिढ्यांपासून करत आहेत. दरवर्षी दिवाळीत सिडको भागात करदोडा विक्रीसाठी येणारे शेख बंधू या व्यवसायातून केवळ उदरनिर्वाहच नाही, तर हिंदू-मुस्लीम सामाजिक बांधिलकीही जपत आहेत.

नायगाव तालुक्यातील कहाळा येथील शेख बशीर शेख अजिज हे आपल्या सहा सख्या भावांच्या सोबतीने हा पारंपरिक व्यवसाय पुढे नेत आहेत. करदोड्यासाठी लागणारा कच्चा माल गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरातून आणला जातो. त्यानंतर कंबरेच्या मापानुसार दोरा आणि गोंडा घरीच तयार केला जातो. भाऊबीजेच्या दिवशी बहीण भावाला ओवाळणी करून प्रेमाचे व सन्मानाचे प्रतीक म्हणून करदोडा बांधते. त्यामुळे या व्यवसायाला मोठे पारंपरिक महत्त्व आहे. या व्यवसायाव्यतिरिक्त शेख परिवार बांगडी विक्रीचा व्यवसायही करतो. सध्या नांदेड शहरातील विविध भागांसह नवीन नांदेड परिसरात अनेक ठिकाणी त्यांनी करदोडा विक्रीची दुकाने थाटली आहेत. नांदेड जिल्ह्यातील विविध तालुक्यांत आणि ग्रामीण भागात त्यांच्या करदोड्याला मोठी मागणी आहे. हा आमचा तीन पिढ्यांपासून चालत आलेला परंपरागत व्यवसाय आहे. आम्ही सहा सख्खे भाऊ मिळून हे काम करतो. यातून आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह तर होतोच, शिवाय सणासुदीच्या निमित्ताने हिंदू-मुस्लीम समाजात सलोखा आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो, अशी भावना शेख बशीर शेख अजिज यांनी व्यक्त केली.

धनेगाव ब्रिजवर नांदेड ग्रामीण पोलिसांची धडाकेबाज कारवाई; गोवंश वाहतूक करणारे दोघे जेरबंद, दोन बैलांना जीवदान

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीणच्या पथकाने गोवंश जातीच्या जनावरांची अवैध व क्रूरपणे वाहतूक करणारे वाहन पकडून कारवाई केली असून, २ गोवंश बैलांची सुटका करण्यात आली आहे.

दि. ९ नोव्हेंबर रोजी प्रभारी अधिकारी अशोक जाधव यांना गोपनीय माहिती मिळाली की, धनेगाव ब्रिजकडे जाणाऱ्या रोडवर वाहनातून गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक होत आहे. माहितीच्या आधारे पोलीस पथकाने नमूद ठिकाणी सापळा रचला.

संशयित अशोक लेलँड कंपनीचे वाहन अडवून पंचांसमक्ष तपासणी केली असता, वाहनामध्ये जनावरांना निर्दयतेने दोरीने बांधून वाहतूक केली जात असलेली गोवंश जातीची २ जनावरे मिळून आली.

पोलीस पथकाने पंचासमक्ष अशोक लेलँड कंपनीचे वाहन (क्र. MH-२६ CH-०४६८) - अंदाजे किंमत चार लाख, २ गोवंश जातीची बैल जनावरे - अंदाजे किंमत रु. १ लाख २० हजार असा एकूण ५ लाख २० हजार रुपये जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत आरोपी शेख जमीर शेख बाबू, वय २५ वर्षे, व्यवसाय चालक, बळीराम सोपान धुतराज, वय ४९ वर्षे दोघे रा. सोनखेड यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे गु.र.नं. १४३९/२०२६, कलम ५, ५(ब), ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमसह कलम ९ प्राण्यांना क्रूरतेने वागणूक प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक जाधव व पोलीस अंमलदार विष्णू कल्याणकर, मुंडे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

मैत्री, बंधुभाव आणि संघभावनेतूनच मुक्तीचा मार्ग सापडतो -धम्मचारी उपायराजा

धम्मक्रांती शिबिराचा वारकवाडीत समारोप; १५० शिबिरार्थींचा सहभाग



नांदेड (प्रतिनिधी)– अज्ञान, मोह, तृष्णा, अहंकार आणि द्वेष यांसारख्या मानसिक विकारांपासून मुक्त होण्यासाठी धम्मविचारांचा अंगीकार करणे आवश्यक आहे. मैत्री, बंधुभाव आणि संघभावनेच्या बळावर समताधिष्ठित समाजनिर्मिती शक्य आहे. रक्ताच्या नात्यांपेक्षाही धम्मातून निर्माण होणारी नाती अधिक व्यापक आणि श्रेष्ठ असतात. त्यामुळे धम्माशी जोडलेली मैत्री जपत विश्वकुटुंबाची संकल्पना प्रत्यक्षात आणावी, असे प्रतिपादन धम्मचारी उपायराजा यांनी केले.

हदगाव तालुक्यातील वारकवाडी येथील उर्गेन भंते संघरक्षित ध्यान भावना केंद्रात त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने ७ ते ११ नोव्हेंबरदरम्यान आयोजित पाच दिवसीय मुक्ती कोण पथे? धम्म अभ्यास शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या शिबिराचे नेतृत्त्व धम्मचारी उपायराजा यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३६ मध्ये मांडलेल्या मुक्ती कोण पथे? या विचारांचे आजही मोठे महत्त्व आहे. जातीयता आणि अन्यायकारक व्यवस्थेतून मुक्त होण्यासाठी केवळ बाह्य संघर्ष पुरेसा नाही, तर मनातील राग, लोभ, द्वेष आणि मोह या विकारांवरही विजय मिळवणे आवश्यक आहे. त्यातूनच आत्मविश्वास आणि परिवर्तनाची खरी ताकद निर्माण होते. आधुनिक काळात इंटरनेटच्या अतिवापराच्या व्यसनापासूनही स्वतःला दूर ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

शिबिरात मिळालेले ध्यानसाधनेचे, अभ्यासाचे व सहजीवनाचे अनुभव केवळ पाच दिवसांपुरते मर्यादित न ठेवता ते दैनंदिन जीवनात उतरवावेत. शिबिरात केलेले संकल्प स्मरणात ठेवून नव्या ऊर्जेने जीवनाची वाटचाल करावी. येथून परतताना मैत्रीचे बळ, बंधुभावाचे नाते आणि संघभावना सोबत घेऊन जावी, असे आवाहनही धम्मचारी उपायराजा यांनी केले.

यावेळी गीत सादरीकरण, मूकनाटिका आणि एकपात्री प्रयोग अशा सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. शेवटी मैत्रीगीताने शिबिराची सांगता झाली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी धम्मचारी चंद्रगर्भ, मैत्रेयकेतू, अभयध्वज, धम्मचारिणी दानदीपा, धम्मचारिणी रत्नलोचना, धम्मचारी मंगलबोधी, विद्याघोष, वज्रघोष, विनयरक्षित, बोधिश्रद्धा, अभयसेन तसेच त्रिरत्न बौद्ध महासंघाचे चेअरमन धम्मचारी पद्मगर्भ यांनी सहकार्य केले.

राणा दग्गुबातीच्या पहिल्याच भयपटात कंगना रणौतची मुख्य भूमिका!

'बाहुबली' चित्रपटातून लोकप्रिय झालेले अभिनेते आणि निर्माते राणा दग्गुबाती आता भयपटांच्या दुनियेत नवी सुरुवात करत आहेत. त्यांच्या निर्मितीत तयार होत असलेल्या 'स्केरी पिक्चर' या आगामी भयपटात अभिनेत्री कंगना रणौत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. निर्मात्यांनी नुकतेच या चित्रपटाचे पहिले पोस्टर आणि मोशन पोस्टर समाजमाध्यमांवर प्रदर्शित केले. त्यातील पार्श्वभूमीवर ऐकू येणाऱ्या गूढ आवाजामुळे प्रेक्षकांना जुन्या 'आहट' या भयमालिकेची आठवण झाली आहे. राणा दग्गुबाती यांनी नव्या भयपटाच्या प्रवासाची सुरुवात होत असल्याचे म्हटले आहे. कंगना रणौत या चित्रपटात प्रमुख भूमिका साकारणार असून, सुमारे १७ वर्षांनंतर ती पुन्हा हिंदी भयपटात दिसणार आहे. पहिली झलक पाहिल्यानंतर चाहत्यांनी समाजमाध्यमांवर उत्सुकता व्यक्त केली असून, कंगना आणि राणा यांच्या या नव्या प्रकल्पाचे स्वागत केले आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन तेलुगू चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक रवि बाबू करणार आहेत. हिंदीतील हा त्यांचा पहिलाच चित्रपट ठरणार आहे. प्रसिद्ध निर्माते सुरेश बाबू यांच्या 'सुरेश प्रॉडक्शन्स' या संस्थेच्या माध्यमातून चित्रपटाची निर्मिती होत आहे. दरम्यान, 'स्केरी पिक्चर'ची संपूर्ण कथा, अन्य कलाकारांची नावे आणि कंगना रणौतच्या भूमिकेबाबत अद्याप अधिकृत माहिती जाहीर करण्यात आलेली नाही. हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होणार असल्याचे निर्मात्यांनी सांगितले आहे.



आधी ऐश्वर्या राय, आता कतरिना कैफ...

आई झाल्यानंतरही अभिनेत्रींना सौंदर्याच्या कसोटीवर का जोखले जाते?

'आता हिचे चित्रपटांमधील करिअर संपले', 'ही अशी कशी दिसू लागली?', 'वजन किती वाढले आहे!' अशा प्रकारच्या टिप्पण्या सध्या समाजमाध्यमांवर अभिनेत्री कतरिना कैफच्या छायाचित्रांवर केल्या जात आहेत. आई झाल्यानंतर तिच्या शरीरात झालेल्या बदलांवरून तिला लक्ष्य केले जात आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी अभिनेत्री ऐश्वर्या राय- बच्चनलाही अशाच टीकेचा सामना करावा लागला होता. मनोरंजन क्षेत्रातील अभिनेत्रींनी कायम सुंदर, सुडौल आणि आकर्षकच दिसले पाहिजे, अशी अपेक्षा का केली जाते? आई झाल्यानंतर त्यांच्या शरीरात होणारे नैसर्गिक बदल स्वीकारण्याची मानसिकता अजूनही का निर्माण झालेली नाही? हा केवळ दोन अभिनेत्रींशी संबंधित विषय नसून स्त्रीच्या शरीरावर समाज आपला अधिकार गाजवण्याच्या मानसिकतेचा प्रश्न आहे.



नेमका वाद काय?

अभिनेत्री कतरिना कैफ अलीकडेच अंबानी कुटुंबाच्या एका कार्यक्रमाला पती विकी कौशलसोबत उपस्थित राहिली होती. यावेळी तिने हिरव्या रंगाचा अनारकली पोशाख परिधान केला होता. तिची छायाचित्रे आणि चित्रफिती समाजमाध्यमांवर प्रसारित होताच काही वापरकर्त्यांनी तिच्या वाढलेल्या वजनावरून टीका करण्यास सुरुवात केली. काहींनी तर तिचे चित्रपटसृष्टीतील करिअर संपल्याच्या आशयाच्या चित्रफितीही तयार केल्या. कतरिना डिसेंबर २०२५ मध्ये विहान या मुलाची आई झाली. मातृत्वानंतर तिच्या शरीरात झालेले बदल हे नैसर्गिक आहेत. सध्या ती कुटुंबासोबत वेळ घालवत असून मुलाच्या संगोपनाला प्राधान्य देत आहे. तिने वजन कमी करावे की नाही, हा तिचा वैयक्तिक निर्णय आहे. मात्र, समाजमाध्यमांवरील काही जणांना तिच्या शरीरातील बदल स्वीकारता येत नसल्याचे या टीकेतून दिसून येते.

» अभिनेत्री म्हणजे कायम सौंदर्याच्या चौकटीतच राहायचे का? : अभिनेत्री असल्यामुळे एखाद्या महिलेने चोवीस तास आकर्षक दिसलेच पाहिजे, अशी अपेक्षा करणे कितपत योग्य आहे? मेकअप केला तर अति मेकअप केल्याची टीका, कमी कपडे घातले तर बोल्ड असल्याचा शिक्का आणि पूर्ण कपडे परिधान केले तर दिखावा करत असल्याचा आरोप. महिलांनी नेमके कसे राहावे, याचे नियम समाजमाध्यमांवरील काही घटकच ठरवू लागले आहेत. चित्रपटसृष्टीत काम करणाऱ्या अभिनेत्रीही सामान्य महिलांप्रमाणेच आयुष्य जगतात. त्यांनाही लग्न, मातृत्व, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक आयुष्य असते. मात्र, अभिनेत्री झाल्यानंतर त्यांना सामान्य महिलांप्रमाणे जगण्याचा अधिकार नसल्यासारखी वागणूक दिली जाते. त्यांच्या प्रत्येक हालचालीवर, कपड्यांवर आणि शरीरयष्टीवर टिप्पणी केली जाते.

» ऐश्वर्या राय- बच्चनलाही करावा लागला होता टीकेचा सामना : कतरिनापूर्वी ऐश्वर्या राय बच्चनलाही मातृत्वानंतर वजन वाढल्यामुळे समाजमाध्यमांवर आणि प्रसारमाध्यमांमधील चर्चांमध्ये टीकेचा सामना करावा लागला होता. ऐश्वर्याने २०११ मध्ये आराध्याला जन्म दिला. त्यानंतर २०१२ मध्ये ती कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी झाली होती. निळ्या रंगाच्या गाऊनमध्ये तिने आत्मविश्वासाने लाल गालिच्यावर उपस्थिती लावली होती. मात्र, तिच्या अभिनयाची किंवा व्यक्तिमत्त्वाची चर्चा करण्याऐवजी काही जणांनी तिच्या वाढलेल्या वजनावर टीका केली. ऐश्वर्याने या टीकेला उत्तर देताना मातृत्वानंतर शरीरात होणारे बदल हा प्रत्येक आईच्या आयुष्यातील नैसर्गिक टप्पा असल्याचे स्पष्ट केले होते. ऐश्वर्याप्रमाणेच नेहा धुपिया, करीना कपूर खान, समीरा रेड्डी आणि बिपाशा बासू यांनाही मातृत्वानंतर शरीरयष्टीवरून टीकेला सामोरे जावे लागले आहे. विशेष म्हणजे, वजन कमी केल्यानंतरही महिलांच्या दिसण्यावरून टीका करणारी मानसिकता संपलेली नाही.

» कतरिना मेहनती अभिनेत्री; मग मातृत्वानंतरची टीका का? : कतरिना कैफ ही चित्रपटसृष्टीतील मेहनती अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. व्यायाम, नियमित सराव आणि शरीरयष्टी राखण्यासाठी ती घेत असलेल्या मेहनतीची चर्चा अनेकदा झाली आहे. अभिनेत्री आलिया भट्टनेही एका मुलाखतीत कतरिना आपल्याला व्यायामासाठी प्रोत्साहित करत असल्याचे सांगितले होते. चित्रपटांमधील नृत्य आणि विविध भूमिकांसाठी कतरिना किती मेहनत घेते, हे तिच्या सहकलाकारांनीही अनेकदा सांगितले आहे. मात्र, मातृत्वानंतर तिचे वजन वाढल्यावर तिच्या आधीच्या मेहनतीकडे आणि कारकिर्दीकडे दुर्लक्ष करून तिच्या शरीरावरच चर्चा सुरू झाली. एखाद्या महिलेचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व केवळ तिच्या वजनावरून ठरवण्याची ही प्रवृत्ती चिंताजनक आहे.

» तंत्रज्ञान बदलले; मानसिकता मात्र तशीच : कतरिना कैफ गेल्या सुमारे २६ वर्षांपासून चित्रपटसृष्टीत कार्यरत आहे. परदेशातून भारतात येऊन हिंदी भाषा शिकणे, अभिनय क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण करणे आणि आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक होण्यापर्यंतचा तिचा प्रवास स्वाभाविक आहे. तंत्रज्ञान बदलले, समाजमाध्यमांची व्याप्ती वाढली, अभिव्यक्तीची साधने बदलली; मात्र महिलांकडे पाहण्याचा काहींचा दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही. अभिनेत्री असो वा सामान्य महिला, मातृत्वानंतर तिच्या शरीरात होणारे बदल हे तिच्या वैयक्तिक आयुष्याचा भाग आहेत. तिच्या शरीरावर टिप्पणी करण्याचा किंवा तिच्या करिअरचा निकाल लावण्याचा अधिकार कोणालाही नाही. महिला ही केवळ अभिनेत्री, मॉडेल किंवा सौंदर्याचे प्रदर्शन करणारी व्यक्ती नसते. ती एक स्वतंत्र माणूस असते. तिच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्याचा, विशेषतः मातृत्वाचा, आदर करण्याची मानसिकता समाजात निर्माण होणे हीच काळाची गरज आहे.






सोपा नव्हता. अभिनयाबरोबरच तिने स्वतःचा सौंदर्यप्रसाधनांचा व्यवसायही उभा केला. तिच्या या व्यावसायिक यशाचे मूल्य शेकडो कोटी रुपयांमध्ये असल्याचे सांगितले जाते. इतक्या वर्षांच्या मेहनतीनंतरही तिच्या मातृत्वाची आणि शरीरयष्टीची चर्चा तिच्या कामापेक्षा अधिक केली जात असेल, तर समाजाच्या विचारसरणीचा प्रश्न उपस्थित होणे

मातृत्वाचा स्वीकार की सौंदर्याच्या चौकटीचा दबाव?

चित्रपटसृष्टीतील महिलांनी कायम आकर्षक आणि निर्दोष दिसले पाहिजे, असा एक अलिखित नियमच तयार झाला आहे. समाजमाध्यमांवरील छायाचित्रे आणि चित्रफितींमुळे हा दबाव अधिक वाढला आहे. मूल जन्माला आल्यानंतर काही आठवड्यांतच अभिनेत्रीने पुन्हा पूर्वीसारखी शरीरयष्टी मिळवावी, अशी अवास्तव अपेक्षा केली जाते. मात्र, प्रसूतीनंतर शरीर पूर्ववत होण्यासाठी प्रत्येक महिलेला वेगवेगळा कालावधी लागतो. काही महिला वजन कमी करण्यासाठी वेळ घेतात, तर काही जणी तातडीने कठोर व्यायाम किंवा आहारनियंत्रण करण्याऐवजी शरीराला सावरण्याची संधी देतात. हा त्यांचा वैयक्तिक निर्णय असतो. त्याला अपयश किंवा निष्काळजीपणा म्हणणे चुकीचे आहे. कतरिनावरील टीका वाढल्यानंतर चित्रपटसृष्टीतील अनेकांनी तिच्या समर्थनार्थ भूमिका मांडली. अभिनेता सलमान खाननेही दूरचित्रवाणीवरील एका कार्यक्रमात अप्रत्यक्षपणे तिच्या समर्थनार्थ भूमिका घेत ट्रोल करणाऱ्यांना सुनावल्याची चर्चा झाली.

नात्यातील धोक्याचे संकेत दुर्लक्षित करू नयेत...

जहीर इकबालने सांगितली सोनाक्षीसोबतची प्रेमकहाणी!



अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि अभिनेता जहीर इकबाल ही बॉलिवूडमधील लोकप्रिय जोडी आहे. दोघेही सोशल मीडियावर एकमेकांसोबतचे मजेशीर व्हिडीओ आणि खासगी आयुष्यातील क्षण शेअर करत असतात. आता लग्नानंतर पहिल्यांदाच दोघे 'तू है मेरी किरण' या चित्रपटात एकत्र झळकले आहेत. या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान त्यांच्या नात्यात घडलेल्या एका खास प्रसंगाचा खुलासा जहीरने मुलाखतीत केला आहे.

जहीरने सांगितले की, चित्रपटाचे चित्रीकरण सुरू झाले, तेव्हा दोघेही प्रियकर-प्रेयसी होते. मात्र, पावसाळ्यामुळे चित्रीकरणात दोन महिन्यांचा खंड पडला. या काळात दोघांनाही मोकळा वेळ मिळणार असल्याने त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे चित्रपटाच्या काही भागाचे चित्रीकरण प्रियकर-प्रेयसी म्हणून, तर उर्वरित भागाचे चित्रीकरण पती-पत्नी म्हणून झाले. मात्र, दोघांनीही आपल्या वैयक्तिक नात्याचा परिणाम चित्रीकरणावर होऊ दिला नाही, असे जहीरने स्पष्ट केले. तो म्हणाला, की 'आम्ही दोघेही कामाच्या बाबतीत व्यावसायिक आहोत. वैयक्तिक आयुष्य कधीही चित्रीकरणाच्या ठिकाणी आणत नाही. हा चित्रपट माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. माझ्या अभिनयाचे कौतुक व्हावे आणि मला अधिक काम मिळावे, अशी माझी इच्छा होती.'

एकमेकांवरील प्रेमाची जाणीव करून देत राहतो...

वैवाहिक नात्यात प्रेमाला सर्वाधिक महत्त्व असल्याचे जहीर मानतो. तो म्हणाला, की आमचे एकमेकांवर किती प्रेम आहे, याची दोघांनाही जाणीव आहे. आमच्यात कधीकधी वाद होतात; पण ते तात्पुरते असतात. मला माहीत आहे की ती माझ्यावर किती प्रेम करते आणि तिलाही माझ्या प्रेमाची खात्री आहे. त्यामुळे छोट्या- मोठ्या वादांमुळे नात्यावर परिणाम होत नाही. नात्यात सर्व काही सुरळीत असतानाही जोडीदाराला आपले प्रेम शब्दांतून आणि कृतीतून व्यक्त केले पाहिजे. अनेकदा लोक हे करायला विसरतात. मात्र, आम्ही एकमेकांना सतत प्रेमाची जाणीव करून देतो. त्यामुळे वाद झाले तरी दुसऱ्या दिवशी सर्व काही ठीक होईल, हा विश्वास असतो, असे तो म्हणाला.

प्रेम आणि वेड यातील सीमारेषा ओळखणे गरजेचे!

'तू है मेरी किरण' हा चित्रपट प्रेमातील अतिआसक्तीवर आधारित आहे. प्रेम आणि वेड यातील फरक स्पष्ट करताना जहीर म्हणाला, 'प्रेम आणि अतिआसक्ती यांच्यात एक अतिशय पुसट सीमारेषा असते. ती ओलांडली, तर आपण समोरच्या व्यक्तीचा अनादर करत असतो. अशा वेळी काही चुकीचे संकेत मिळत असतात; मात्र अनेक जण त्याकडे प्रेम म्हणून पाहून दुर्लक्ष करतात. नात्यातील असे धोक्याचे संकेत कधीही दुर्लक्षित करू नयेत.' हा चित्रपट अतिआसक्तीचे समर्थन करत नाही, असेही त्याने स्पष्ट केले. प्रत्येक चित्रपटातून काय करावे, हेच शिकवले जाते असे नाही; काही चित्रपट काय करू नये, याचीही जाणीव करून देतात. 'तू है मेरी किरण' हा त्यापैकीच एक चित्रपट असल्याचे जहीरने सांगितले.

शाहरुखच्या भूमिकेपेक्षा वेगळी व्यक्तिरेखा

चित्रपटाचे शीर्षक शाहरुख खानच्या 'डर' या गाजलेल्या चित्रपटातील गाण्यावरून घेतले आहे. त्या चित्रपटातील अतिआसक्त प्रियकराच्या भूमिकेपासून आपल्या व्यक्तिरेखेची शैली वेगळी असल्याचे जहीरने सांगितले. शाहरुख खान यांची भूमिका अधिक आक्रमक आणि नाट्यमय होती; तर आपली व्यक्तिरेखा शांतपणे सोनाक्षीच्या पात्राला त्रास देणारी आहे. आपण आरडाओरड न करता वेगळ्या पद्धतीने ही भूमिका साकारल्याचे त्याने सांगितले.




चांगल्या कामासाठी सतत प्रयत्नशील

चित्रपटसृष्टीतील सात वर्षांच्या कारकिर्दीबद्दल बोलताना जहीरने अधिकाधिक चांगले काम करण्याची इच्छा व्यक्त केली. तो म्हणाला, की मला सतत काम करण्याची ओढ आहे. चांगल्या लोकांसोबत काम करायचे आहे आणि वेगवेगळ्या भूमिका साकारायच्या आहेत. मात्र, चित्रपटसृष्टीत काम मिळवणे दिसते तितके सोपे नाही. निर्मात्याला तुमच्यावर विश्वास असेल, तरच तो तुमच्यावर पैसे गुंतवतो. सध्या चांगला चित्रपटही चालेल याची खात्री नसते. त्यामुळे मी स्वतः निर्माते आणि दिग्दर्शकांना संपर्क करतो, फोन करतो आणि ऑडिशनही देतो. अधिकाधिक चांगले काम मिळवण्यासाठी माझे प्रयत्न सुरूच आहेत, असे तो म्हणाला.

मुंबईतील घरात विचित्र हालचालींचा अनुभव

श्रुती हासनने सांगितला अंगावर शहारे आणणारा प्रसंग, हनुमान चालीसा पठणासह केले धार्मिक विधि

विज्ञानाने भूत-प्रेतांच्या अस्तित्वाला अधिकृत मान्यता दिलेली नसली, तरी अनेक जण अशा अनुभवांचे दावे करत असतात. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री श्रुती हासन हिलाही मुंबईतील स्वतःच्या घरात काही विचित्र अनुभव आल्याचा दावा केला आहे. घरात ठेवलेला पुतळा वारंवार आपली जागा बदलत असल्याचे तिच्या लक्षात आले होते. या प्रकारामुळे अस्वस्थ झाल्यानंतर तिने काही धार्मिक विधी केल्याचे सांगितले.



नेहा धुपिया आणि अंगद बेदी यांच्या 'डबल डेट' या यूट्यूब कार्यक्रमात बोलताना श्रुतीने हा अनुभव सांगितला. ती म्हणाली, की एखाद्या ठिकाणी विचित्र ऊर्जा असल्यास आपल्याला त्याची जाणीव होते. चेन्नईतील तिच्या घरात वातावरण सामान्य आणि शांत असते; मात्र मुंबईतील घरात काहीतरी वेगळे घडत असल्याची जाणीव तिला सातत्याने होत होती. श्रुतीच्या घरात मानवी आकाराचा एक मोठा पुतळा होता. तिने त्याचे नाव 'फिओना' ठेवले होते. तिचे मित्रही घरी आल्यानंतर या पुतळ्याला अभिवादन करायचे. मात्र, काही काळानंतर हा पुतळा स्वतःची जागा आणि ठेवण बदलत असल्याचे श्रुतीच्या लक्षात आले. हा प्रकार नेमका कोणामुळे घडत आहे, असा प्रश्न तिला पडला. अखेर तिने तो पुतळा तोडून टाकल्याचे सांगितले. या अनुभवाची तुलना तिने २००७ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'आय ॲम लिजेंड' या चित्रपटातील पुतळ्यांच्या दृश्यांशी केली. या विचित्र अनुभवातून बाहेर पडण्यासाठी श्रुतीने हनुमान चालीसाचे पठण केले. हातात मीठ घेऊन तिने घरात धार्मिक विधी केले आणि त्यानंतर संपूर्ण घर सुरक्षित केल्याचे तिने सांगितले. या सर्व प्रकारानंतर आता घरात शांतता असल्याचेही श्रुतीने स्पष्ट केले.

हायकोर्टाच्या नावाने फसवणूक! १२९ वेबसाइट्स ब्लॉक, पीएमओने मागितले स्पष्टीकरण

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– पंतप्रधान कार्यालयाने आज (१४ नोव्हेंबर) दूरसंचार सचिव अमित अग्रवाल यांना बोलावून एका मोठ्या पडताळणी त्रुटीबद्दल तातडीने स्पष्टीकरण मागितले आहे. या त्रुटीमध्ये अधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयाच्या बनावट निर्देशांच्या आधारे १२९ सट्टेबाजीच्या वेबसाईट्स ब्लॉक करण्याचे आदेश दिले होते. वकील असल्याचे भासवणाऱ्या व्यक्तींनी दूरसंचार विभागाला बनावट न्यायालयीन कागदपत्रे ईमेल केल्याचे उघडकीस आल्यानंतर या वरिष्ठ अधिकाऱ्याला पीएमओच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर हजर होण्यासाठी दुसऱ्या राज्यातील आपला अधिकृत दौरा अर्धवट सोडून यावे लागले.



भारतात ऑनलाईन सट्टेबाजीवर बंदी असली तरी, या घटनेमुळे डिजिटल सामग्री हटवण्याच्या यंत्रणेतील त्रुटींबाबत सरकारच्या सर्वोच्च स्तरावर गंभीर चिंता निर्माण झाली आहे. अधिकाऱ्यांना अशी भीती आहे की, कमकुवत पडताळणी नियमांचा गैरवापर करून बनावट न्यायालयीन कागदपत्रांचा वापर करून कायदेशीर वेबसाईट्स किंवा व्यवसायांचा आवाज दाबला जाऊ शकतो. दोन कथित न्यायालयीन निर्देशांभोवती एकावर राजस्थान उच्च न्यायालयाचे नाव होते आणि दुसरा अलाहाबाद उच्च न्यायालयाकडून आल्याचा दावा करत होता.

दोन्ही कागदपत्रांवर न्यायालयाचे बनावट लोगो, खोटे शिक्के आणि बनावट क्युआर कोड होते. या मेलच्या आधारे कारवाई करत, दूरसंचार मंत्रालयातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी देशभरातील इंटरनेट सेवा पुरवठादारांना १२९ ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरील प्रवेश प्रतिबंधित करण्याचे निर्देश दिले. न्यायालयाच्या नोंदणी कार्यालयांनी नंतर पुष्टी केली की त्यांच्या अधिकृत सर्व्हरवर असे कोणतेही निर्देश अस्तित्वात नव्हते. राजस्थान उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रारने तो दस्तऐवज बनवाट असल्याचे घोषित केले, तर अलाहाबाद उच्च न्यायालयाने असा कोणताही आदेश कधीही पारित झाला नसल्याची पडताळणी केल्यानंतर ६ नोव्हेंबर रोजी पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल केली.

विशेष म्हणजे, विभागीय कारवाईच्या पत्रव्यवहारासोबतच या दोन्ही बनावट फाईल्स दूरसंचार विभागाच्या अधिकृत पोर्टलवर महिनोन्महिने सार्वजनिकरित्या अपलोड केलेल्या होत्या आणि शनिवारपर्यंत त्यातील एक दस्तऐवज वेबसाईटवर उपलब्ध होता. अंतर्गत मंत्रालयाकडून चौकशी आणि फौजदारी तपास सुरु आहे. ही त्रुटी उघडकीस आल्यानंतर क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी ब्लॉक करण्याचे आदेश जारी करण्यापूर्वी मूलभूत नोंदणी पडताळणी कशी टाळली, हे निश्चित करण्यासाठी दूरसंचार मंत्रालयाने अंतर्गत चौकशी सुरू केली आहे.

मराठी सिनेमांचा महाकुंभ! 'चित्रपताका २०२६' महोत्सवाचे आज उद्घाटन; प्रवेश नोंदणीचे शुल्क दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी

मुंबई (प्रतिनिधी)– सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या बहुप्रतिक्षित 'चित्रपताका' या महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाचे दिमाखदार उद्घाटन नुकतेच पार पडले आहे. प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात १५ ते १८ नोव्हेंबर या कालावधीत हा चार दिवसीय भव्य महोत्सव रंगणार आहे. यंदाचे हे महोत्सवाचे दुसरे पर्व असून, चित्रपट रसिकांसाठी हा एक सुवर्णकाळ ठरत आहे.

प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी संकुलात रंगणाऱ्या या महोत्सवाच्या उद्घाटन सोहळ्यास सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार, विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे- पाटील यांच्यासह चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाची सुरुवात नितीन सुपेकर दिग्दर्शित आणि उपेंद्र लिमये आणि जितेंद्र जोशी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'बंधू' या अद्याप अप्रदर्शित असलेल्या चित्रपटाने झाली. दोन भावांमधील नातेसंबंध, प्रेम, संघर्ष आणि त्याग यावर आधारित या भावस्पर्शी सिनेमाने पहिल्याच दिवशी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.

या चार दिवसांच्या महोत्सवात प्रेक्षकांना तब्बल ३३ आशयघन सिनेमे आणि १५ हून अधिक संवादसत्रांची पर्वणी अनुभवता येणार आहे. यामध्ये ७ परिसंवाद, ४ विशेष मुलाखती आणि कार्यशाळांचा समावेश आहे. ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे, सचिन पिळगांवकर, ज्येष्ठ अभिनेत्री शुभा खोटे आणि दिग्दर्शक ओम राऊत यांच्या विशेष मुलाखती या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरत आहेत. चित्रपट निर्मितीतील नवे तंत्रज्ञान, लेखन, दिग्दर्शन, अभिनय आणि वितरण यांसारख्या विविध विषयांवर येथे सखोल चर्चा होत आहे.

दुर्मीळ उपक्रम: दुष्काळग्रस्तांना मदत

या महोत्सवाचे एक विशेष वैशिष्ट्य म्हणजे, प्रेक्षकांकडून आकारण्यात येणारे चार दिवसांचे अवघे १०० रुपये नोंदणी शुल्क संपूर्णपणे दुष्काळ निवारणासाठी मुख्यमंत्री सहायता निधीत जमा करण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार यांच्या सूचनेनुसार हा संवेदनशील निर्णय घेण्यात आला आहे.

पुण्यातील प्रसिद्ध वैशाली आणि रुपाली हॉटेलचे 'एफडीए'कडून परवाने निलंबित!

पुणे (प्रतिनिधी)– महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने शुक्रवारी पुण्यातील दोन प्रसिद्ध उपाहारगृहे, हॉटेल वैशाली आणि हॉटेल रुपाली यांचे परवाने तात्पुरते निलंबित केले आहेत. तपासणीत शौचालयांजवळ अन्न साठवणूक, अस्वच्छ स्वयंपाकघर आणि तयार खाद्यपदार्थांची अयोग्य हाताळणी यासह अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या अनेक नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप आहे. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी आरोप केला आहे की, उकडलेले बटाटे, शिजवलेला भात आणि इतर तयार खाद्यपदार्थ उघड्या कॉरिडॉरमध्ये ठेवले जाते होते. तर इडली आणि डोशाचे पीठ उघड्या आणि अस्वच्छ ठिकाणी तयार केले जात होते.



महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन विभागाने क्रॉस कंटॅमिनेशनच्या म्हणजेच पदार्थ एकमेकांत मिसळण्याच्या धोक्याकडेही लक्ष वेधले. कारण तयार खाद्यपदार्थांच्या थेट वर कच्च्या कापलेल्या भाज्या ठेवल्या जात होत्या. तसेच स्वयंपाकघरात कीटकरोधक दरवाजे नव्हते, असाही आरोप आहे. 'तापमान निरीक्षणाच्या नोंदी आणि अद्ययावत पिण्याच्या पाण्याची चाचणी अहवाल उपलब्ध नव्हते. शिवाय तपासणीदरम्यान वैध ऱ्हेड्धरउ - प्रशिक्षित अन्न व सुरक्षा पर्यवेक्षक उपस्थित नव्हता,' असे सहायक आयुक्त म्हणाले, ज्यांनी त्या आस्थापनांच्या अन्न व्यवसाय परवान्याच्या तात्काळ निलंबनाचे आदेश दिले.

अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी १३ नोव्हेंबर रोजी हॉटेल रुपालीची पाहणी केली आणि स्वयंपाकघरातील परिस्थिती असुरक्षित असल्याचा अहवाल दिला. षस्वयंपाकघर उघडे आणि अपुरे सुरक्षित असल्याचे आढळून आले, ज्यामुळे अन्न तयार करण्याची जागा धूळ, घाण आणि कीटकांच्या संपर्कात येत होती. परिसरात पाणी साचणे, अपुरी स्वच्छता आणि कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या अयोग्य पद्धती आढळून आल्या,' असे सांगितले. अधिकाऱ्यांनी केलेल्या आरोपानुसार कच्चा माल, अर्ध प्रक्रिया केलेले अन्न आणि तयार खाद्यपदार्थ योग्य आवरण, लेबलिंग आणि वापरण्याची अंतिम तारीख या माहितीशिवाय साठवण्यात आले होते. याविरुद्ध एफडीएच्या पुणे विभागाने कडक कारवाई केली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये भरधाव खासगी बस पुलाचे कठडे तोडून खाली कोसळली; एकाचा मृत्यू, तर २० जण गंभीर जखमी

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)– महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावर एका भीषण अपघाताची थरारक घटना समोर आली आहे. सकाळी प्रवाशांनी भरलेली एक ट्रॅव्हल्स बस अनियंत्रित होऊन पुलावरून थेट २० फूट खाली कोसळली. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली असून प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. बस खाईत पडल्याची माहिती मिळताच स्थानिक प्रशासनाचे हातपाय गळाले आणि तातडीने मदतकार्य सुरू करण्यात आले.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी या ट्रॅव्हल्स बसमध्ये एकूण २६ प्रवासी प्रवास करत होते. यामध्ये १४ पुरुष, ९ महिला आणि २ लहान मुलांचा समावेश होता. बस २० फूट खाली कोसळल्यामुळे आतमध्ये बसलेले प्रवासी अडकले आणि मदतीसाठी हाहारडा करू लागले. घटनेची खबर




मिळताच चिकलठाणा पोलीस ठाण्याचे पथक अवघ्या काही वेळातच घटनास्थळी दाखल झाले. बसमधील अडकलेल्या प्रवाशांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी पोलिसांना बसचे काच फोडण्याचे मोठे पाऊल उचलावे लागले. अथक परिश्रमांनंतर पोलिसांनी सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढून जखमींना तात्काळ उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात हलवले. दुर्दैवाने, या भीषण अपघातात एका पुरुष प्रवाशाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर अन्य एक पुरुष प्रवासी गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

या भीषण अपघातानंतर छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली आणि काही काळ वाहतूक पूर्णपणे प्रभावित झाली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तातडीने घटनास्थळी एकतर्फी वाहतूक सुरू केली आणि वाहनांना पर्यायी मार्गांवर वळवले, जेणेकरून महामार्गावर अधिक जाम होणार नाही. यानंतर, दुर्घटनाग्रस्त ट्रॅव्हल्स बसला बाहेर काढण्यासाठी दोन मोठ्या क्रेनची मदत घेण्यात आली. क्रेनच्या साहाय्याने बसला खाईतून यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आले. एवढेच नव्हे तर, पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून अपघातानंतर पसरलेला कचरा आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या तुटलेल्या सुरक्षा रेलिंगचा मलबा बाजूला केला. रस्ता पूर्णपणे साफ केल्यानंतर महामार्गावरील वाहतूक पुन्हा एकदा सुरळीत करण्यात आली असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

अल्पवयीन मुलींना आपल्या जाळ्यात ओढणाऱ्या भारतीय तरुणाला ३० वर्षांची शिक्षा, अल्पवयीन सांगून करायचा ब्लॅकमेल

ब्रिटन (वृत्तसंस्था)– ब्रिटनमध्ये शिकणाऱ्या २७ वर्षीय भारतीय वंशाच्या बिलाल काझी या तरूणाला अल्पवयीन मुलींना आपल्या जाळ्यामध्ये ओढून त्यांना ब्लॅकमेल केल्याच्या आरोपाखाली तुरूंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. बिलाल काझी या तरूणाने अल्पवयीन मुलींसोबत, संवाद साधताना १४ वर्षांचा ब्रिटिश मुलगा असल्याचे भासवत, सोशल मीडियावरील मुलींसोबत त्याने फ्रेंडशिप केली. तब्बल ७० अल्पवयीन मुलींना आपल्या जाळ्यात ओढत या तरूणाने त्यांचं शोषण केलं आहे. सोशल मीडियावर मुलींसोबत फ्रेंडशिप करत, त्यानंतर, प्रेमाचे नाटक करून तो त्यांच्याकडून खाजगी फोटो आणि व्हिडिओंची मागणी करायचा. जर एखाद्या मुलीने नकार दिला, तर तो ते फोटो कुटुंबीय आणि मित्रांना पाठवण्याची धमकी देत असे.

चेस्टर विद्यापीठात शिकणाऱ्या काझीने ३७ गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्यावर अल्पवयीन मुलींचे अश्लील फोटो तयार करणे, त्यांना ब्लॅकमेल करणे आणि अल्पवयीन मुलींना लैंगिक कृत्यांसाठी प्रवृत्त करणे या गुन्ह्यांचा समावेश आहे. क्राऊन कोर्टामध्ये बिलाल काझीवर संबंधित आरोपांवर सुनावणी सुरू आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीमध्ये त्याने गुन्ह्यांची कबुली दिली आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बिलालने ऑगस्ट २०२१ ते ऑगस्ट २०२५ या



काळात मुलींना लक्ष्य केले.

त्याने स्नॅपचॅट, रोब्लॉक्स आणि विंक यांसारख्या सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मवर 'रीस' या नावाने फेक अकाऊंट बनावायचा. अल्पवयीन मुलींसोबत, संवाद साधताना काझी स्वत:ला १४ वर्षांचा ब्रिटिश मुलगा असल्याचे भासवायचा. अल्पवयीन मुलांसोबत संवाद साधतना तो अकाऊंटसाठी ब्रिटिश तरूण- तरूणींचे फोटो वापरून त्यांच्यासोबत संवाद साधायचा.

सोशल मीडियावर मुलींसोबत फ्रेंडशिप करत, त्यांच्यासोबत प्रेमाचे नाटक करून तो त्यांच्याकडून खाजगी फोटो आणि व्हिडिओंची मागणी करायचा. जर एखाद्या मुलीने नकार दिला, तर तो ते फोटो कुटुंबीयांना किंवा मित्रांना पाठवण्याची धमकी द्यायचा. काही प्रकरणांमध्ये, त्याने अल्पवयीन मुलींचे सोशल मीडिया अकाऊंट हॅक करून ते फोटो आपल्या मित्रांना सुद्धा पाठवले होते. त्याने स्नॅपचॅटद्वारे काही व्हिडिओदेखील गुपचूप रेकॉर्ड केल्याचे स्पष्ट झाले आहे.

शेख हसीनांना परत नेण्यासाठी भारताची अट

नवी दिल्ली (प्रतिनिधी)– भारताने बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणासाठी दोन अटी ठेवल्या आहेत. प्रसारमाध्यमांच्या वृत्तानुसार, बांगलादेशच्या लष्कराने त्यांना परत न्यावे आणि त्यांच्यावर निष्पक्ष खटला चालवावा, अशी भारताची इच्छा आहे. या अटी बांगलादेशातील तारिक रहमान यांच्या नेतृत्वाखालील बीएनपी सरकारसमोर ठेवण्यात आल्या आहेत. तथापि, या दोन अटींना अद्याप स्वतंत्रपणे दुजोरा मिळालेला नाही. बीबीसी बांगलाच्या वृत्तानुसार, हसीना यांच्या प्रत्यार्पणावरून दोन्ही देशांमध्ये सुरू असलेला तणाव कमी करण्यासाठी भारत मार्ग शोधत आहे. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी शुक्रवारी सांगितले की, प्रत्यार्पण ही एक कायदेशीर बाब असून कायद्यानुसार निर्णय घेतला जाईल.

शेख हसीना यांच्या परतीची जबाबदारी बांगलादेश लष्कराने घ्यावी, अशी भारताची इच्छा आहे. यासाठी, बांगलादेश लष्कराला दिल्लीला एक लष्करी विमान पाठवावे लागेल, जे हसीना यांना ढाका येथे घेऊन येईल. दुसरा पर्याय म्हणजे लष्कराने भारत- बांगलादेश सीमेवरील एका निश्चित ठिकाणाहून त्यांना घेऊन येणे. ऑगस्ट २०२४ मध्ये सत्तेवरून पायउतार झाल्यानंतर, हसीना यांनी बांगलादेश सोडून भारतात परतण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळीही त्या लष्करी विमानानेच भारतात दाखल झाल्या होत्या.

भारताची दुसरी अट हसीना यांच्या कायदेशीर संरक्षणाशी संबंधित आहे. भारताची इच्छा आहे की बांगलादेश सरकारने त्यांना त्यांच्या मृत्युदंडाच्या शिक्षेविरुद्ध अपील करण्याची संधी द्यावी आणि जुलै २०२४ मध्ये आंदोलकांच्या मृत्यूशी संबंधित खटल्याची पुनर्विचारणा करावी. भारताची इच्छा आहे की हसीना यांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी मिळावी.

महादेव ऑनलाइन बेटिंग ॲप घोटाळाच्या 'सीबीआय-ईडी'च्या कारवाईत धक्कादायक खुलासा; घोटाळ्याची रक्कम ९२,००० कोटींवर!

मुंबई (प्रतिनिधी)– 'महादेव ऑनलाइन बुक' बेकायदेशीर बेटिंग ॲप प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (उइख) देशभरातली सहा राज्यांत तब्बल ३३ ठिकाणी एकाच वेळी छापेमारी केली आहे. या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार आणि प्रमुख आरोपी सौरभ चंद्राकर याने कोठडीतील चौकशीदरम्यान दिलेल्या खळबळजनक माहितीच्या आधारे ही धडक कारवाई करण्यात आली आहे. अवैध बेटिंगमधून जमा होणाऱ्या काळ्या पैशांची वाहतूक, त्याचे कलेक्शन आणि आर्थिक व्यवहार सांभाळणारे पॅनल ऑपरेटर्स, मध्यस्थ, हवाला ऑपरेटर्स आणि आंगडिया यांच्या ठिकाणांना सीबीआयने या मोहिमेत प्रामुख्याने लक्ष्य केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या व्यापक शोधमोहिमेत महाराष्ट्रातील मुंबई आणि नागपूरमध्ये, दिल्ली, अमृतसर, राजस्थानमधील धोलपूर, भोपाळ, रायपूर, दुर्ग, इंदूर, अहमदाबाद, वडोदरा आणि सुरत या प्रमुख शहरांचा समावेश आहे. कारवाईदरम्यान सीबीआयच्या पथकाने अनेक ठिकाणी थेट सुरू असलेले बेटिंग आणि जुगाराचे पॅनल्स उद्ध्वस्त केले आहेत. या छाप्यांत मोठ्या प्रमाणात डिजिटल उपकरणे, मोबाईल फोन, लॅपटॉप आणि महत्त्वाची आर्थिक कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. भाड्याने घेतलेल्या किंवा इतरांच्या नावावर उघडलेल्या बँक खात्यांद्वारे (म्यूल अकाउंट्स) आणि हवाला मार्गाने ही कोट्यवधींची अवैध रक्कम परदेशात पाठवली जात असल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनात आले होते. जप्त केलेल्या पुराव्यांची उइख कडून तांत्रिक तपासणी केली जात आहे.

सौरभ चंद्राकरच्या सखोल चौकशीतून या



पचे देशव्यापी जाळे आणि कार्यपद्धती पूर्णपणे उघड झाली आहे. तपासादरम्यान गोळा केलेले डिजिटल आणि कागदोपत्री पुरावे समोर ठेवून त्याची कसून चौकशी करण्यात आली. संयुक्त अरब अमिरातीमध्ये (युएई) या प्लॅटफॉर्मचे मुख्य कार्यालय असून, तिथून भारतातील पॅनल ऑपरेटर्सच्या मोठ्या साखळीमार्फत हा अवैध व्यवसाय चालवला जात होता. हे स्थानिक ऑपरेटर्स ग्राहकांचे नवीन आयडी तयार करून बेटिंगचे पैसे गोळा करत आणि नंतर हवाला चॅनेलद्वारे ते परदेशात पाठवत असत, अशी माहिती सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. दुसरीकडे, सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी चंद्राकरच्या कोठडीसाठी न्यायालयात अर्ज सादर करताना अत्यंत धक्कादायक माहिती उघड केली.


ऑक्टोबर २०२३ मध्ये पहिले आरोपपत्र दाखल झाल्यानंतरही सप्टेंबर २०२६ मध्ये पाचवे पुरवणी आरोपपत्र दाखल होईपर्यंत हे बेटिंग ॲप कोणताही अडथळा न येता सुरूच होते, असा गंभीर दावा ईडीने केला आहे. जुलै २०२५ मध्ये पीएमएलए कायद्याच्या कलम ५० अंतर्गत नोंदवलेल्या जबाबात सह- आरोपी रजत कुमार सिंग आणि विशाल रमाणी यांनी दुबईतून अनुक्रमे ८ ते १० आणि सुमारे ३५ बेटिंग पॅनल्स स्वतंत्रपणे चालवत असल्याची कबुली दिली आहे. तपासाच्या सुरुवातीला या गुन्ह्यातील रक्कम सुमारे १० ते ११ हजार कोटी रुपये असल्याचा अंदाज होता, मात्र गेल्या तीन वर्षांत त्यात तब्बल नऊ पटीने वाढ होऊन ती आता ९२,००० कोटी रुपयांवर पोहोचल्याचे ईडीने न्यायालयाला सांगितले. जुलै २०२५ मधील एका छाप्यादरम्यान सह- आरोपी रजत सिंगला चंद्राकरच्या मोबाईल नंबरवरून सतत फोन येत असल्याचेही समोर आले होते.

चंद्राकरच्या मोबाईल नंबरचा वापर करणारी व्यक्ती आणि संपूर्ण मनी ट्रेल उघड करण्यासाठी चंद्राकरची कोठडी आवश्यक असल्याचे ईडीने स्पष्ट केले. न्यायालयाने चंद्राकरला १९ नोव्हेंबरपर्यंत सात दिवसांची ईडी कोठडी सुनावली असून, परदेशातील साथीदार, यात सामील असलेले सरकारी कर्मचारी आणि फरार आरोपींच्या प्रत्यार्पणासाठी दोन्ही यंत्रणा पुढील तपास करत आहेत.

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेंडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



Change In Name

My old Name is **ABDULLAH ARIB MOHAMMED RAFIQUE AHMED** Which now I am Changing as New Name **ABDULLAH ARIB** Henceforth my all correspondence will be done as per my new name. Please consider the name
Address: House No 9-1-311 Gani Pura Diwani Bawli Itwara Nanded Maharashtra 431604

जाहीर प्रगटन

मौजे म्हाळजा ता.जि. नांदेड मनपा हद्दीतील गट नं. ०४ मधील स्वामी रामानंद तीर्थ चतुर्थ कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. म्हाळजा ता.जि. नांदेड येथील प्लॉट नं. १०४ साईज रुंदी - २५ फुट व लांबी ३० फुट ज्याचे एकूण क्षेत्रफल ७५० चौ.फुट ज्यावर टीनशेडचे गोडाऊन (शॉप) असून सदर मालमत्ता सालेहा बेगम शमशीरखान रा. मन्यारगल्ली, चौक बाजार नांदेड संमती देणार मोहम्मद फहाद अब्दुल जलील रा. फतेबुरूज इतवारा नांदेड यांच्याकडून डॉ. मोहम्मद साजिद इरफान मोहम्मद युसुफखान रा. दुधगल्ली, कुबा मस्जिद जवळ, उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

प्लॉटची चतुःसिमा :-

- **पूर्वेस** - २० फुट रुंद रोड
- **पश्चिमेस** - प्लॉट नं. १०३
- **दक्षिणेस** - प्लॉट नं. १०५
- **उत्तरेस** - खुली जागा.

तरी वरील चतुःसिमेच्या आतील प्लॉट बद्दल कोणाचा हक्क, उजर, दावा, आक्षेप, सरकारी किंवा निमसरकारी बोझा असेल त्यांनी आपला उजर, आक्षेप हे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर किंवा कायदेशीर सल्लागाराच्या कार्यालयीन पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेला उजर, आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही व नंतर प्लॉटचे खरेदीखत डॉ. मोहम्मद साजिद इरफान मोहम्मद युसुफखान यांच्या नावे करून घेण्यात येईल. करीता हे जाहीर प्रकटन.

कायदेशीर सल्लागारामार्फत (Through Advocate)	जाहीर प्रकटन देणार / खरेदीदार (Owner / Purchaser)
डॉ. ॲड. पठाण एम. नवेद जफर अली खान(B.J. & M.S., LL.B., LL.M., SET, Ph.D. in Law)Bar Council Reg. No.: MAH / 1411 / 2020, 8721Advocate, High CourtMobile: +919890146190	डॉ. मोहम्मद साजिद इरफान मोहम्मद युसुफखानरा. दुधगल्ली, कुबा मस्जिद जवळ, उमर कॉलनी, देगलूर नाका, नांदेड.मोबाईल नं.: 9960785225

Change In Name

MY OLD NAME IS **KHAN AQSA ZARIN ZAFARKHAN**. NOW I AM CHANGING AS A NEW NAME **KHAN AQSA ZARIN JAFFAR KHAN PATEL.** HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. PLOT NO 4, NEAR SANA HIGH SCHOOL NOMANIYANAGAR CHAITANYANAGAR POST TARODA BK NANDED MS 431605. MOB.NO.8668476921

Change In Name

MY OLD NAME IS **PATHAN AIYAZ KHAN**. NOW I AM CHANGING AS A NEW NAME **PATHAN AIYAZ KHAN ASADULLAH KHAN.** HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME PLEASE KINDLY CONSIDER THE SAME. FULL ADDRESS. PLOT NO 4, NEAR SANA HIGH SCHOOL NOMANIYA NAGAR CHAITANYA NAGAR POST TARODA BK NANDED MS 43165. MOB. NO.8668476921.

रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

गोदातीर समाचार

रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308

मुदखेड पोलिसांकडून वाळू माफियांवरील दोन स्वतंत्र कारवायांत ४८.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त; ४ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेदरम्यान मुदखेड पोलिसांनी गौण खनिजाचे बेकायदेशीर उत्खनन व विनापरवाना वाहतूक विरोधात दोन स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण ४८ लाख ३५ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त करून ४ आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.

पहिली कारवाई मुगट पाटी रोडवर करून ८.१० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रभारी अधिकारी, मुदखेड पोलीस स्टेशन यांना गोपनीय माहिती मिळाली की, मुगट पाटी रोडवर एका टिपर वाहनातून अवैधरित्या वाळूची वाहतूक होत आहे. सदर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन संशयित वाहन (एमएच-२६एडी-२३१५) थांबवून पाहणी केली असता, वाहनामध्ये अंदाजे २ ब्रास वाळू असल्याचे आढळून आले. संबंधितांकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी /कागदपत्रांबाबत चौकशी केली असता सदर वाळूची वाहतूक अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी पंचनामा करून सदर वाहन किंमत ८ लाख व त्यामध्ये २ ब्रास वाळू, किंमत १० हजार असा एकूण ८ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी विठ्ठल भुजंगराव बोचरे (वय ४० वर्षे, रा. पाथरड, ता. मुदखेड) अनोळखी वाहन मालक यांच्याविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २४३/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३ सह कलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमीन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दुसरी कारवाई : रहाटी ते माळकौठा रोडवर ४०.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

रहाटी ते माळकौठा जाणाऱ्या रोडवर संशयित वाहन क्र. (एमएच-२६एडी-१९१८) थांबवून वाहनाची पाहणी केली असता, वाहनामध्ये अंदाजे ५ ब्रास वाळू असल्याचे आढळून आले. संबंधितांकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी /कागदपत्रांबाबत चौकशी केली असता सदर वाळूची वाहतूक अनधिकृत असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी पंचनामा करून सदर वाहन किंमत ४० लाख व त्यामध्ये ५ ब्रास वाळू, किंमत २५ हजार असा एकूण ४० लाख २५ हजार किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपी संभाजी एकनाथ पवार (वय ३२ वर्षे, रा. आमदुरा, ता. मुदखेड), अनोळखी वाहन मालक यांच्याविरुद्ध मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. क्र. २४५/२०२६, कलम ३०३(२), ३(५) भारतीय न्याय संहिता, २०२३ सह कलम ४८(७), (८) महाराष्ट्र जमीन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक संदीप जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि गणेश कराड, पोउपनि रमेश पुणेबोईनवाड, सुरेश जाधव, पोलीस अंमलदार चक्रधर, शिंदे, सुंकनवार यांनी पार पाडली आहे. नांदेड जिल्ह्यात अवैध गौण खनिज उत्खनन, रेती चोरी, विनापरवाना वाहतूक करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई सुरूच राहणार आहे.

नागरिकांनी गोदावरी नदीपात्र अथवा इतर ठिकाणी अवैध रेती उत्खनन, वाहतूक किंवा गौण खनिज चोरी होत असल्याची माहिती मिळाल्यास त्यांनी तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस नियंत्रण कक्षास माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिंदेंच्याच पक्षातील महिला पदाधिकाऱ्याचा गंभीर आरोप

शिंदेंचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्यावर जातिवाचक शिवीगाळ व मारहाणीची देगलूर पोलिसांत तक्रार

नांदेड (प्रतिनिधी)– राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्याविरोधात शिवसेनेच्याच महिला पदाधिकाऱ्याने पोलिसांत तक्रार दाखल केल्याने नांदेड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

शिवसेनेच्या महिला तालुका प्रमुख मीराबाई गंगाधर तमलूरकर यांनी देगलूर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे. शिधावाटप कार्यक्रमादरम्यान जातिवाचक शिवीगाळ करून मारहाण केल्याचा गंभीर आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे.

देगलूर तालुक्यातील खानापूर येथील लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालयात दि. ७ नोव्हेंबर रोजी शिवसेनेच्या वतीने गरीब नागरिकांसाठी शिधावाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला महिला तालुका प्रमुख मीराबाई तमलूरकर उपस्थित होत्या. याच कार्यक्रमादरम्यान वाद निर्माण झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

तक्रारीनुसार खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांनी जातीचा उल्लेख करून अपमानास्पद शिवीगाळ केली. तसेच केस ओढून मारहाण केल्याचा आरोप मीराबाई तमलूरकर यांनी केला आहे. पती बचावासाठी मध्यस्थी करण्यासाठी पुढे आले असता त्यांनाही मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याशिवाय व्यंकट पाटील खतगावकर, उमेश मुंडे आणि डॉ. व्यंकट धुमाळे यांनीही जातिवाचक शिवीगाळ करून अपमानित केल्याचा आरोप तक्रारदार महिलेने केला आहे. यावेळी उमाकांत पाटील, सायलू गायकवाड, राजेंद्र गोपड आणि साहेबराव नटकर यांनी मध्यस्थी करून आपली सुटका केल्याचेही त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.

सत्ताधारी शिवसेनेच्याच महिला पदाधिकाऱ्याने उपमुख्यमंत्र्यांच्या खाजगी सचिवांविरोधात गंभीर आरोप केल्याने या प्रकरणाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मीराबाई तमलूरकर यांनी पोलिसांकडे केली आहे.

या तक्रारीवर देगलूर पोलिसांकडून कोणती कारवाई केली जाते, तसेच आरोप करण्यात आलेल्या व्यक्ती यावर काय भूमिका मांडतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. तक्रारीतील आरोपांची अधिकृत पडताळणी आणि पोलिसांच्या पुढील कारवाईनंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे.



नांदेड – शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू, पहिले केंद्रीय शिक्षणमंत्री मौलाना अबुलकलाम आझाद, क्रांतिकारक लहुजी साळवे यांची संयुक्त जयंती काँग्रेस कार्यालय येथे साजरी करून अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकारातून निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी खा. रविंद्र चव्हाण, डॉ. श्रावण रॅपनवाड, डॉ. रेखा चव्हाण, आनंद चव्हाण, मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, महेश देशमुख, श्रीनिवास मोरे, अजिज कुरेशी, गणेश ढगे, डॉ. अनंत राऊत, आनंद कल्याणकर, शंकर शिंदे, गगन यादव, बाळासाहेब देशमुख, बापूसाहेब पाटील, दिपकसिंग हुजारिया, संजय वाघमारे, ज्योती कदम, देशमुख, नसिम पठाण, मधुकर दिघे, नसिम पठाण, गोविंद पाटील, श्याम मनाठकर आदी मान्यवर उपस्थित होते, **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

बिरसा मुंडा यांची जयंती गौरवदिन म्हणून साजरी होणार

पत्रकार परिषदेत आ. राजूरकर यांची माहिती

नांदेड (प्रतिनिधी)– क्रांतीसूर्य विरसा मुंडा यांनी अल्पायुष्यात आदिवासी समाजासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची केंद्र व राज्य शासनाने दखल घेतली असून, त्यांच्या जयंतीनिमित्त १५ नोव्हेंबर हा दिवस गौरवदिन म्हणून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आ. अमरनाथ राजूरकर यांनी शनिवारी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

बिरसा मुंडा यांनी समाजातील व्यसनमुक्तीसाठी प्रयत्न करण्यासोबतच जंगलांचे संरक्षण आणि आदिवासी समाजाला विविध सवलती मिळव्यात यासाठी लढा दिला. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन केंद्र व राज्य शासनाकडून आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. आदिवासी आश्रमशाळांमध्ये गुणवत्ताधारक शिक्षकांची भरती, विविध शिष्यवृत्ती योजना, तसेच आदिवासी समाजाला शासनाच्या योजनांची माहिती मिळावी यासाठी गावागावांत जनजागृती करण्यात येत आहे.

विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन केंद्रेही स्थापन करण्यात आली आहेत. राज्य शासन बिरसा मुंडा यांच्या नावाने विविध योजना रावबत आहे. शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये पवित्र पोर्टलद्वारे २ हजार ५०० गुणवत्ताधारक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. आदिवासी समाजाचे सर्वेक्षण करून त्यांना आवश्यक सवलती देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. तसेच शासकीय आदिवासी वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांसाठी लवकरच भोजनालयाची व्यवस्था सुरू करण्यात येणार असून, त्यांना दर्जेदार भोजन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. मोठ्या शहरांमधील वसतिगृहांची क्षमता वाढविण्याचे निर्णयही घेण्यात आले आहेत. केंद्र व राज्य शासनाकडून आदिवासी समाजाच्या विकासासाठी विविध योजना रावविण्यात येत असून, १५ नोव्हेंबर रोजी विरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा दिवस गौरवदिन म्हणून साजरा करण्यात येणार असल्याचे राजूरकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला माजी राज्यमंत्री डी.पी. सावंत, विजय येवनकर, लक्ष्मीकांत गोणे उपस्थित होते.

सेवानिवृत्त जवान गंगाधर बबिलवाड यांचे निधन



भोकर (प्रतिनिधी)– तालुक्यातील मौजे बल्लाळ येथील गंगाधर पोशटी बबिलवाड यांचे शनिवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर रविवार, दि. १५ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता भोकर येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत असे त्यांच्या निकटवर्तीयांनी कळविले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, नातू असा परिवार आहे.

श्री नगरेश्वर वैश्य मंदिर ५३ व्या परिचय मेळावा प्रमुखपदी शंतनू कोडगिरे तर अर्थसमिती प्रमुखपदी गजानन उत्तरवार

नांदेड (प्रतिनिधी)– येथील श्री नगरेश्वर वैश्य मंदिर, सराफा, नांदेडच्यावतीने ५३ वा आंतरराज्य उपवर-उपवधू परिचय मेळावा येत्या दि. २३ व २४ जानेवारी २०२७ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला देशपातळीहून आर्य वैश्य समाजबांधव उपस्थिती लावणार आहेत.

या संदर्भात व्यवस्थापनाच्या दृष्टीने मंदिराचे अध्यक्ष भागवत गंगमवार यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच एक बैठक पार पडली. या बैठकीत ५३ व्या परिचय मेळाव्याच्या प्रमुखपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक शंतनू



कोडगिरे यांची तर अर्थसमिती प्रमुखपदी प्रसिद्ध उद्योजक गजानन उत्तरवार आणि जाहिरात समिती प्रमुखपदी आनंद बिडवई यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या बैठकीस मंदिराचे उपाध्यक्ष बिपीन गादेवार, सचिव सुरेश कोटगिरे, कोषाध्यक्ष पांडुरंग येरावार, सहसचिव सतीश मुक्कावार आणि विश्वस्त मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

अवैध धंद्यांवर 'मास रेड'! एकाच दिवसात ४१ ठिकाणी धाडी, ४१ आरोपींना अटक, १ लाख १३ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त

नांदेड (प्रतिनिधी)– जिल्हाभर अवैध व्यवसायांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशानुसार दि. १३ नोव्हेंबर २०२६ रोजी व्यापक विशेष 'मास रेड' मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांनी समन्वयाने एकाच दिवशी शहरी व ग्रामीण भागातील संशयित ठिकाणांवर धाडसत्र राबवून दारूबंदी, मटका तसेच इतर बेकायदेशीर व्यवसायांवर प्रभावी कारवाई केली. या विशेष मोहिमेमुळे जिल्ह्यातील अवैध धंद्यांना मोठा आळा बसला आहे.

या विशेष मोहिमेत एकूण ४१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४१ आरोपींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. तसेच विविध प्रकारचा एकूण १ लाख १३ हजार ६७० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ठाणे प्रभारी अधिकारी, दुय्यम अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सहभाग नोंदवून पार पाडली आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा विशेष मोहिमा यापुढेही जिल्हा पोलीस सातत्याने राबविणार असून, अवैध व्यवसायांबाबतची माहिती नागरिकांनी निर्भयपणे स्थानिक पोलीस ठाण्यास किंवा डायल ११२ वर देऊन पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

उधारी बिअर न दिल्याने बारमध्ये धुमाकूळ! गल्ल्यातील ७५ हजार लुटले, कारसह साहित्याची तोडफोड; तिघांवर गुन्हा दाखल

नांदेड (प्रतिनिधी)– उधारीवर बिअर मागितली आणि ती न दिल्याचा राग आल्याने तिघांनी बारमध्ये घुसून धुमाकूळ घातल्याची धक्कादायक घटना भोकर तालुक्यातील पाळज येथे घडली आहे. गल्ल्यातील ७५ हजार रुपये हिसकावून नेण्यासह बारमधील साहित्य आणि कारची तोडफोड करून ३० ते ४० हजार रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप आहे. तसेच जिवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ रात्री ९ वाजेच्या दरम्यान पाळज येथील मदीरा बार समोर ही घटना घडली. आरोपी पिराजी सायन्ना मनगुनवार, वय ४३ वर्षे, लक्ष्मीबाई सायन्ना मनगुनवार, वय ६० वर्षे, साईनाथ (पूर्ण नाव माहीत नाही) सर्व रा. पाळज, ता. भोकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी योगीता साईनाथ अनमोड यांच्याकडे उधारीवर बिअरची मागणी केली. फिर्यादीने बिअर देण्यास नकार दिल्याने आरोपींनी शिवीगाळ सुरू केली. वाद वाढत जाऊन आरोपींनी बारमधील गल्ल्यातील नगदी ७५ हजार रुपये काढून घेतले.

इतक्यावरच न थांबता आरोपींनी बारमधील साहित्याची तसेच बाहेर उभी असलेल्या कारची तोडफोड करून अंदाजे ३० ते ४० हजार रुपये किंमतीचे नुकसान केले. जाताना फिर्यादीला जिवे मारण्याची धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

योगीता साईनाथ अनमोड (वय २८ वर्षे, रा. पाळज, ता. भोकर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भोकर ठाण्यात गु.र.नं. ५९५/२०२६, कलम ३२४(५), ३०९(४), ३३२(सी), ३५१(१), ३०८(१), ३५२ भारतीय न्याय संहिता-२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हजूर साहिबमध्ये दशम पित्यांना भावपूर्ण श्रद्धांजली

♦ ज्योतिजोत दिनानिमित्त सामूहिक मूलमंत्र पठण, हजारो संगतीची उपस्थिती

नांदेड (प्रतिनिधी)– सर्वस्व अर्पण करणारे दशम पिता साहिब श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांच्या पवित्र ज्योतिजोत (सचखंड गमन) दिनानिमित्त तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब येथे अत्यंत भक्तीभावाने आणि आदराने विशेष गुरमत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी गुरुद्वारा बोर्डाचे अधीक्षक रविंदरसिंघ कपूर यांनी संगताला संबोधित करताना ऐतिहासिक माहिती दिली. ते म्हणाले की, साहिब श्री गुरु गोबिंदसिंघजी महाराज यांनी सन १७०८ मध्ये याच पवित्र स्थानी शब्द गुरु 'श्री गुरु ग्रंथ साहिबजी' यांना गुरुपदावर विराजमान केले होते. त्यानंतर पंचमीच्या दिवशी दशम पातशाह याच पावन भूमीतून सचखंड गमन (निजधामास) गेले होते.

त्याच दिवसाच्या स्मरणार्थ प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंपरेनुसार दुपारपासूनच गुरबाणी कीर्तनाला सुरुवात झाली. यामध्ये तख्त साहिबच्या सर्व रागी जत्थ्यांनी आळीपाळीने मधुर गुरबाणी कीर्तनाद्वारे आपली हजेरी लावली.

दरम्यान, भाई परमवीरसिंघजी यांनी संगतीला दशम पिताजी यांच्या सचखंड गमनाची साखी (कथा) अत्यंत सविस्तर आणि भक्तीभावाने श्रवण करवली. या पवित्र प्रसंगी गुरु साहिबांना विशेष रूपाने शक्करपाऱ्याच्या प्रसादाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिबचे कारजकारी जत्थेदार सिंघ साहिब संत बाबा रामसिंघजी आणि सर्व पंजप्यारे साहिबान यांच्या प्रमुख उपस्थितीत सायंकाळी ४:१५ ते ४:३० वाजेपर्यंत (१५ मिनिटे) सामूहिकरीत्या मूलमंत्राचे पठण करण्यात आले.



त्यानंतर संपूर्ण विश्वात सुख-शांती, परस्पर बंधुभाव आणि शीख पंथाच्या उन्नतीसाठी (चढती कला) अरदास (प्रार्थना) करण्यात आली.

या प्रसंगी लंगर साहिबचे संत बाबा बलविंदर सिंघजी, गुरुद्वारा बोर्डाचे सचिव रविंदरसिंघ बुंगई, गुरुद्वारा बोर्ड सदस्य मनप्रीतसिंघ कुंजीवाले, बोर्ड सदस्य गुरमीतसिंघ महाजन, सहायक अधीक्षक जैमलसिंघ ढिल्लो, सहायक अधीक्षक बलविंदरसिंघ फौजी यांच्यासह अनेक मान्यवर तसेच देश-विदेशातून मोठ्या संख्येने गुरुघरी दर्शनासाठी आलेली संगत उपस्थित होती.

बिरसा मुंडा जयंतीनिमित्त गरजू शेतकरी व विद्यार्थ्यांना मदत करणार; नांदेडमध्ये आज अभिवादन सोहळा

नांदेड (प्रतिनिधी)– आदिवासी समाजाचे महान क्रांतिकारक, स्वातंत्र्यसेनानी आणि जननायक धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आदिवासी मन्नेरवारलू महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने नांदेड शहरात सामाजिक बांधिलकी जपत अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जयंती केवळ उत्सवापुरती मर्यादित न ठेवता समाजातील गरजू शेतकरी कुटुंबांना आर्थिक मदत आणि गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करण्याचा संकल्प महासंघाने केला आहे.

हा कार्यक्रम रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत भगवान बिरसा मुंडा नियोजित पुतळा स्थळ, छत्रपती चौक, भार्गव क्लासजवळ, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येणार आहे. यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार, तसेच भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्य, आदिवासी समाजाची अस्मिता, संस्कृती, स्वाभिमान, सामाजिक एकता आणि शैक्षणिक व आर्थिक विकास या विषयांवर मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे.

या कार्यक्रमाला आदिवासी मन्नेरवारलू समाजातील नांदेड जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवक, महिला, प्रतिष्ठित नागरिक आणि समाजबांधव उपस्थित राहणार आहेत. समाजातील सर्व संघटनांना एकत्र आणून सामाजिक एकता व संघटनात्मक बळकटीकरणाचा संदेश देण्याचाही या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

भगवान बिरसा मुंडा यांनी जल, जंगल आणि जमीन या आदिवासींच्या मूलभूत हक्कांसाठी ऐतिहासिक संघर्ष केला. अन्यायाविरुद्ध लढा, समाजाचे संघटन, स्वाभिमान आणि आदिवासी संस्कृतीचे संरक्षण यासाठी त्यांनी दिलेले योगदान आजही संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांना खऱ्या अर्थाने अभिवादन करण्यासाठी समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे महासंघाने म्हटले आहे.

आज अनेक शेतकरी आर्थिक संकटांचा सामना करीत आहेत. तसेच आर्थिक परिस्थितीमुळे अनेक गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होत आहेत. ही परिस्थिती लक्षात घेऊन जयंतीनिमित्त अनावश्यक खर्च आणि दिखाऊपणाला फाटा देऊन गरजू शेतकरी व विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी समाजबांधवांनी आर्थिक योगदान द्यावे, असे आवाहन महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

Godateer Samachar हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com